रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड मंगळवार । दि. २८ जुलै २०२६ । अंक ५२ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### नीटमुळे अजून एक जीवन संपलं

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील जलालपूर गावातील एका १८ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन जीवन संपवले. अंकिता सांगळे असे मृत मुलीचे नाव आहे. नीट परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे ती निराश झाली होती. याच मानसिक दबावामध्ये तिने जीवन संपवण्याचा निर्णय घेतला आहे. तत्पूर्वी तिने कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकिताचे मेडिकलचे शिक्षण घेण्याचे स्वप्न होते. नीट परीक्षेची ती दीर्घकाळापासून तयारी करत होती.

### बंद आंदोलनात विद्यार्थ्यांवर गोळीबार

**पटना :** विद्यार्थी संघटनांच्या बिहार बंद आणि आंदोलनादरम्यान सिवानमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. आंदोलनादरम्यान, एसपी पुरण झा यांच्या अंगरक्षकाने जमावाच्या दिशेने एके-४७ ने गोळीबार केला असून, त्याचा व्हिडिओ समोर आला. व्हिडिओ समोर येताच, पोलिसांच्या कृतीवर आणि बळाच्या वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. प्रकरण चिघळल्यानंतर, पोलीस मुख्यालयाने संपूर्ण घटनेचा अहवाल मागवला. त्यानंतर, एसपी पुरण झा यांचा अंगरक्षक अभिषेक पटेलला निलंबित करण्यात आले आहे.

## भ्रष्ट अधिकाऱ्यांसाठी

# महसूल यंत्रणा बंद ?

- तलाठी संघाच्या आंदोलनावर जनतेचा संताप
- लाचखोरीच्या आरोपांनी बदनाम अधिकाऱ्याच्या बचावासाठी जनता वेठीस



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक झालेले शहापूरचे मंडळ अधिकारी रविदास जाधव यांच्या समर्थनार्थ रायगड जिल्हा तलाठी संघाने पुकारलेले कामबंद आंदोलन संतापजनक असल्याची तीव्र प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहे.

**मंडळ अधिकाऱ्याला न्यायालयीन कोठडी**

जमीन भुसंपादन प्रक्रियेत आणि नुकसान भरपाई वाटपात लाखो रुपयांचा घोटाळा झाल्याप्रकरणी मंडळ अधिकारी रविदास जाधव, रितेश पाटील आणि कुमार नारायण बैकर या तिघांना अटक करण्यात आली होती. सोमवारपर्यंत झालेल्या पोलीस कोठडीनंतर त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावल्याची माहिती पोलिसांकडून उपलब्ध झाली आहे. रविदास जाधव यांच्याविरोधात यापुर्वी पुरवठा निरीक्षक असतानाही कारवाई झाल्याची चर्चा सुरु आहे.

जनतेची सेवा करण्यासाठी पगार घेणाऱ्या महसूल कर्मचाऱ्यांनी एका अधिकाऱ्याच्या अटकेच्या निषेधार्थ संपूर्ण महसूल व्यवस्था ठप्प करण्याचा निर्णय घेतल्याने ही सरकारी कर्मचाऱ्यांची संघटना आहे की भ्रष्ट अधिकाऱ्यांची संरक्षण समिती? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

पोयनाड पोलिसांनी जमिनीच्या व्यवहारातील फसवणुकीच्या गुन्ह्यात रविदास जाधव यांना अटक केली. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना त्यांच्या •> पान ५ वर

# ई-टॉयलेट बनले मृत्यूचे सापळे




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात नगरपरिषदेने बसवलेल्या ई-टॉयलेटमध्ये पर्यटक अडकण्याची घटना घडली. या घटनेने ई-टॉयलेटबद्दल संभ्रम निर्माण झाला असून, पर्यटक आणि स्थानिकदेखील घाबरले आहेत. नगरपरिषदेने ही ई-टॉयलेट ३७ लाख रुपये रकमेने खरेदी केली असून, गेली काही महिने निर्माण झालेला पालिकेच्या कारभाराबद्दल संभ्रम आणखी वाढला आहे. •> पान ५ वर

> हे ई-टॉयलेट आहे की मृत्यूचा सापळा? ही बाब जर तिच्या पतीच्या लक्षात आली नसती, तर कदाचित आत अडकलेल्या महिलेचा गुदमरून मृत्यू झाला असता. वेळीच नगरपरिषदेने आपला कारभार सुधारावा, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल.
>
> – कल्पना पाटील, माजी मुख्याध्यापिका

## वेधक

### ज्येष्ठाला ६५ लाखांचा गंडा

**पनवेल :** खारघर सेक्टर-२१ मधील ज्येष्ठाला अपस्टॉक कंपनीच्या नावाने बनावट व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये जोडण्यात आले. तेथे आदिती वर्मा, काव्या चतुर्वेदी आणि इतर संशयितांनी नफ्याचे खोटे स्क्रीनशॉट्स दाखवून त्यांना गुंतवणुकीसाठी प्रवृत्त केले. आरोपींनी जनावट ॲपद्वारे रजिस्ट्रेशन करायला लावून विविध बँक खात्यांमध्ये तब्बल ६५ लाख १९ हजार रुपये भरण्यास भाग पाडले. ॲपवर मोठा नफा दिसू लागल्याने ज्येष्ठाने पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता, आणखी २७ लाख रुपयांची मागणी केली. पैसे न भरल्यास खाते फ्रीज करण्याची धमकी देण्यात आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने नवी मुंबई पोलिसांकडे तक्रार नोंदवली.

### माथेरान-नेरळ घाटात अपघात

**नेरळ:** उल्हासनगर येथील कुटुंब चारचाकी वाहनाने माथेरान येथ आले होते. दिवसभर पर्यटनाचा आनंद घेऊन सायंकाळी परतीचा मार्ग धरला. ते माथेरान-नेरळ या घाट रस्त्याने जात असताना जुमापट्टीच्या अलीकडे असलेल्या एस वळणावर त्यांची गाडी रस्त्यावरील सिमेंट कठड्याला धडकली. ही धडक एवढी भीषण होती की गाडी कठडे तोडून पलीकडील झाडावर जाऊन आदळली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या अपघातात गाडीचे मोठे नुकसान झाले असून, गाडीतील चार प्रवासी जखमी झाले. नेरळ पोलिसांनी जखमींना तत्काळ रुग्णालयात नेले.

### दिल्ली पोलिसांची ‘सुप्रीम’ खरडपट्टी

**नवी दिल्ली :** शांततापूर्ण आंदोलन करणे हा एक घटनात्मक अधिकार आहे, तो हिरावून घेतला जाऊ शकत नाही. केवळ आंदोलन आहे म्हणून पोलिसांची क्रूरता किंवा अतिरिक्त बळाचा वापर समर्थनीय ठरू शकत नाही, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांच्या अत्याचारावर सुप्रीम खरडपट्टी केली आहे. जंतर मंतर येथे दि.२० जुलै रोजी झालेल्या पोलीस लाठीचार्जशी संबंधित याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले आहे. खंडपीठाने असेही म्हटले की, आंदोलनादरम्यान पोलीस कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले तितकेच चिंताजनक आहेत आणि सरकारला यावर उत्तर देण्यास सांगितले पाहिजे.

# शेकापच्या मेळाव्यात सामील व्हा




**चित्रलेखा पाटील यांचे आवाहन**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

लढाऊ पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाकडे पाहिले जाते. महाराष्ट्रसह देशातील प्रत्येक घटक शेकापकडे एक वेगळ्या दृष्टीने पाहात आहे. विद्यार्थी, शेतकरी, कामगार, कष्टकरी व वंचित घटकासाठी लढणारा पक्ष म्हणून पाहिले जाते. त्यामुळे शेकापची प्रतिमा राज्यासह देशात चांगली आहे. येत्या २ ऑगस्ट रोजी शेकापचा ७९ वा वर्धापन दिन खालापूरमध्ये होणार आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. युवकांसह महिला व इतर सर्व कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात सामील व्हावे, असे आवाहन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर तयारीसाठी अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात सोमवारी (दि.२७) बैठक पार पडली. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या. यावेळी शेकाप नेत्या तथा रायगड जिल्हा परिषदेच्या माजी •> पान ५ वर

# आमदारांच्या गावातच कोट्यवधींची तस्करी

**पोलिसांसह होमगार्डच्या सर्तकतेमुळे चार कोटींचा ऐवज जप्त**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

व्हेल या संरक्षित वन्यजीव प्राण्याच्या उलटीची तस्करी करणाऱ्याला चाळमळा येथून अटक करण्यात आली आहे. अलिबाग पोलीस आणि होमगार्ड जवानांच्या सर्तकतेमुळेच ४ कोटी २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. आमदारांच्या गावातच अवैध धंद्यांना ऊत आल्याने चर्चेला उधाण आले आहे. ही घटना सोमवारी (दि.२७) पहाटेच्या सुमारास चाळमळा येथील जेट्टीजवळ घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या आदेशानुसार, सागरी किनाऱ्यावरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांसह होमगार्ड तैनात केले जात आहेत. अलिबागचे पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि.२६) सायंकाळपासून ते सोमवारी (दि.२७) सकाळपर्यंत पोलिसांसह होमगार्डमार्फत थळ येथील चाळमळा जेट्टीवर गस्त ठेवण्यात आली होती.

दरम्यान, अलिबागचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष पाटील, पोलीस हवालदार अजित देशमुख, नितेश वरसोलकर, होमगार्ड जवान अनिल राठोड, करण नागावकर, जगदीश पवार, भालचंद्र पाटील हे बंदोबस्त करीत असताना सोमवारी (दि.२७) मध्यरात्रीनंतर पहाटेच्या सुमारास एक तरुण दुचाकी (एमएच-०६-बीझेड-६३४१) घेऊन चाळमळा जेट्टीवर फिरत होता. त्याची हालचाल संशयित वाटल्यानंतर पोलिसांनी गाडी थांबवून त्याची विचारपूस केली. गाडीतील डिकी तपासली असता, व्हेल या संरक्षित जातीच्या वन्य जीवाची उल्टी एका पिशवीत दिसून आली. राहुल हातणी असे या तरूणाचे नाव असून, तो थळमधील चाळमळा येथील रहिवासी आहे. •> पान ५ वर

# पादचारी पूल की धबधबा?

- पुलाची दुरवस्था प्रवाशांसाठी मोठी डोकेदुखी
- प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे छतावरून पाणीगळती

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्टेशनवरील पादचारी पुलाची दुरवस्था सध्या प्रवाशांसाठी मोठ्या डोकेदुखीचा विषय ठरत आहे. रेल्वे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे छतावरून मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी थेट पुलावर आणि प्रवाशांच्या अंगावर कोसळत आहे. या पादचारी पुलावर छत बसवण्यात आले असले, तरी पावसाचे पाणी आत येण्यापासून रोखण्यात हे छत पूर्णपणे अपयशी ठरले आहे. त्यामुळे या पुलावर अक्षरशः धबधब्यासारखे दृश्य पाहायला मिळत आहे. जोरदार पावसामुळे छतावरून आणि बाजूने पाण्याचे जोरदार फवारे आत येत असल्याने पुलावरून चालताना प्रवाशांना चक्क छत्री उघडूनच प्रवास करावा लागत आहे. कामावर जाणारे चाकरमानी आणि महिला प्रवाशांना भिजतच हा पूल पार करावा लागत असून, साचलेल्या पाण्यामुळे घसरून पडण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. प्रशासन प्रवाशांकडून भाडे वसूल करते; पण मूलभूत सोयी-सुविधा देण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. पुलावर असूनही भिजावे लागत असेल तर या छताचा काय उपयोग? असा उद्विग्न सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# खारभूमी कार्यालयात वाढदिवसाचा जल्लोष

- कामकाजाचा उडाला बोजवारा; पत्रकार पोहोचताच आवराआवर
- अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीने कारभारावर प्रश्नचिन्ह



**। पेण । प्रतिनिधी ।**

नागरिकांची कामे रखडलेली असताना शासकीय कार्यालयात अधिकारी-कर्मचारी आपली कर्तव्ये बजावत आहेत की, वाढदिवसाच्या जल्लोषात मग्न आहेत? पेण-खाचरखिंडी येथील खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभागाच्या कार्यालयाला प्रसारमाध्यमांच्या अचानक भेटीत याच प्रश्नाचे धक्कादायक चित्र पाहायला मिळाले. अनेक कर्मचारी आपल्या जागेवर अनुपस्थित असताना कार्यालयात उपस्थित असलेले कर्मचारी नियमित कामकाजाऐवजी वाढदिवसाच्या तयारीत व्यस्त असल्याचे दिसून आले. पत्रकार कार्यालयात पोहोचताच मात्र या जल्लोषाला अचानक ब्रेक लागला आणि घाईघाईने आवराआवर सुरू झाली.

उपअभियंता नासुंकड यांच्या कार्यालयातही केवळ कनिष्ठ अभियंता रा.पा. हंबीर उपस्थित असल्याचे आढळले. •> पान ५ वर

# घोड्यांच्या लिदीला ‘ई-टेम्पो’चा पर्याय!

- माथेरानमधील प्रदूषणाला बसणार आळा
- मालवाहतूकही स्वस्त होण्याची शक्यता



**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानच्या पर्यावरणासाठी डोकेदुखी ठरत असलेल्या घोड्यांच्या लिदीचा प्रश्न आणि वाढती मालवाहतूक यावर ई-टेम्पो हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. घोड्यांची लिद वाहून नेण्याबरोबरच मालवाहतुकीसाठी ई-टेम्पोचा वापर वाढल्यास येथील घोड्यांची संख्या कमी होऊन लिदीचे प्रमाण तब्बल ३० टक्क्यांपर्यंत घटण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यासोबतच मालवाहतूकही तुलनेने स्वस्त होऊ शकते. •> पान ५ वर

Shree Gopinath Mahadev Vedak Pratisthan's
G.M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY, TALA
APPROVED BY AICTE & DTE GOVT. OF MAHARASHTRA & AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI



CIVIL ENGINEERING
COMPUTER ENGINEERING
MECHANICAL ENGINEERING
ADMISSION OPEN
FIRST YEAR & DIRECT SECOND YEAR
B NAAC
Institute Code : 3447
www.gmvit.com
principal@gmvit.com

Dr. Dilip N. Jaiswal, Principal, 9022802204
Prof. S.N. Jadhav, Admission Incharge, 9022938458
Prof. K.P. Risbud, Asst. Admission Incharge, 8087898571
Prof. Jitesh Bhagat, Asst. Admission Incharge, 9021663422

At. Post & Taluka : Tala, Dist - Raigad, Maharashtra - 402111

भारतीय शेतकरी कामगार पक्ष
रायगड
वर्धापन दिन
दिनांक २ ऑगस्ट २०२६

लाल सलाम

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता राशी पेट्रोल पंप, खालापूर फाटा, ता. खालापूर जि. रायगड येथे पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
सुरेश नामदेव खैरे
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# भात लागवडीच्या कामांना वेग

## मजुरांची मागणी वाढली



| पाताळगंगा | प्रतिनिधी |

गेल्या काही दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसानंतर भात लागवडीच्या कामांना वेग आला आहे. सुरुवातीला मुसळधार पावसामुळे शेतात पाणी साचल्याने लागवडीच्या कामात अडथळे निर्माण झाले होते. मात्र, पावसाने काही काळ विश्रांती घेतल्याने शेतकरी पुन्हा जोमाने शेतात उतरले असून भात लागवडीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. मात्र शेतमजुरामुळे शेतीची कामे खोळंबली असल्याचे पहावयास मिळत आहे.

पहाटेपासूनच शेतांमध्ये शेतकरी, महिला व पुरुष भात लागवडीत व्यस्त पहावयास मिळत आहे. ट्रॅक्टरच्या साहाय्याने चिखलणी करून भाताची रोपे लावण्याचे काम सुरू असून अनेक ठिकाणी शेतांमध्ये गजबजलेले वातावरण पाहायला मिळत आहे. वेळेत लागवड पूर्ण करण्यासाठी शेतकरी धावपळ करत आहेत. दरम्यान, यंदा शेतमजुरांची टंचाई जाणवत असल्याने अनेक शेतकऱ्यांना मजूर मिळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. मजुरीचे दर वाढले असूनही उपलब्ध मजूर कमी असल्याने शेतकरी त्यांची मनधरणी करून कामावर आणत आहेत. काही ठिकाणी एकाच दिवशी अनेक शेतकऱ्यांकडून शेतीच्या कामे घेतल्यामुळे मजुरांची मागणी वाढली आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - कोशाणे, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं./ प्लॉट नं | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री. समिता गजानन राऊत | ३३/२/अ/२ | ४.५०.०० | ४५.०० |

सदरची बिनशेती जमिन मिळकत ही वरील मालकांची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २८/०७/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. नवनाथ गणू ठोंबरे**
पत्ता. कोल्हीवली, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.८००७३२७९७९/८१४९२११३६६

# अध्यक्षपदी जे एस.म्हात्रे यांची निवड

| हमरापूर | प्रतिनिधी |

राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाच्या कोकण विभागीय अध्यक्षपदी पेण येथील निवृत्त शिक्षक जनार्दन तथा जे. एस. म्हात्रे यांची निवड करण्यात आली. महासंघाच्या नुकताच पार पडलेल्या बैठकीत अरुण मडके ठाणे राज्य कोषाध्यक्ष, रामकृष्ण जवकर बुलढाणा राज्य उपाध्यक्ष, विनोद कोकरे मुंबई राज्य कार्या सचिव, भगवान कासले मुंबई राज्य कार्या सहसचिव, जनार्दन तथा जे.एस. म्हात्रे- रायगड कोकण विभागीय अध्यक्ष, संजय आजबले भंडारा जिल्हाध्यक्ष, संजय झंझाड भंडारा जिल्हा सरचिटणीस, राजेंद्र भोयर वर्धा जिल्हाध्यक्ष, प्रकाश चरडे वर्धा सरचिटणीस याप्रमाणे नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. आपल्या कार्याची दखल घेऊन आपली राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाच्या विविध पदावर निवड करण्यात आली आहे असे त्यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे. या निवडीबद्दल जे.एस. म्हात्रे यांचे पेण तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.



## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | Secretary / Chairman, Mandal Co-Operative Housing Society Ltd., Plot no 18 & 19, Sector No 2, New Panvel. | ०१ नारळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Sindhi Prem Mandal Co-Operative Housing Society Ltd., Plot no 18 & 19, Sector No 2, New Panvel येथील सोसायटी आवारामधील ०१ नारळाचे झाड हे धोकादायक पडण्याच्या स्थितीत आहे. |
| २. | Secretary / Chairman. Adhiraj Garden Co-Operative Housing Federation Ltd., Cypress CHS Ltd., Plot No. 32, Sector 5, Kharghar | ०१ पाम झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Sindhi Prem Mandal Co-Operative Housing Society Ltd., Plot no 18 & 19, Sector No 2, New Panvel या सोसायटीच्या आवारातील ०१ झाड धोकादायक पडण्याच्या स्थितीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(स्वरूप खारगे)**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. PMC-PARK/399/2026-PTAD

## MAHATRANSCO — e-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend. 18/26-27 RFX 7000040586 2nd Call | Work of providing and fixing of 200 W LED flood lights IP 65 on existing high mast towers for yard lighting at various substations under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee: Rs. 500/-+ GST.** | **Rs. 77,34,882/-** including taxes |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 24.07.2026 at 11:00 Hrs. to 03.08.2026 up to 11:00 Hrs., Opening date: 03.08.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
**Mobile No.** 8412050202 **E-mail ID:** se7200@mahatransco.in

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**अधिसूचना क्र. 13-14/2026-27**

क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक, रत्नागिरी, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) यांच्यामार्फत कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील खेड व कणकवली रेल्वे स्थानकांवरील बहुउद्देशीय स्टॉलच्या वाटपासाठी पात्र ठेकेदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदेद्वारे खुली निविदा (दोन पाकिट प्रणाली) आमंत्रित करण्यात येत आहे. **निविदा सूचना क्र.: केआर/डीसीएम/आरएन/सीओएमएल/एमपीएस-केएचईडी-केकेडब्ल्यू, दिनांक: 28.07.2026. निविदा बंद होण्याची दिनांक व वेळ**: 27.08.2026 रोजी 16:00 वाजेपर्यंत. **निविदा उघडण्याची दिनांक**: 27.08.2026 रोजी 16:30 वाजता. निविदाकाराने **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर निविदा दस्तऐवज प्राप्त करता येतील.

दिनांक : २८ जुलै २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे डोंगरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| | १० | १०/१०/क | ०-६०-०० | ०-४८ |
| १) प्रविण बाळकृष्ण मुंढे<br>२) पुरुषोतम बाळकृष्ण मुंढे | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ४० पॉ ०० मात्र. | | | |

प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२८/०७/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्री. केतन जगदिश भोईर, रा. घर नं. ४२ बी, मु. पो. कुंडेवहाळ, मराठी शाळे जवळ, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे आसलपाडा, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १/८ | ०.०७.००<br>पो.ख. ०.०२.०० | ०.०८ | श्रीमती सुंदराबाई रघुनाथ तरे, वैगेरे एकुण ५. |
| | एकुण ०.०९.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २८/०७/२०२६

सही/-
**ॲड. उषा जे.कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नांदगांव, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक अमित दिनानाथ दळवी यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नांदगांव ता. मुरूड | ६७०/२/१ | ०-०७-७० बागायत<br>०-००-३० पो.ख.<br>०-०८-०० एकुण | १.४८ |

वर्णन केलेली जमिन मिळकत तसेच त्यावर असणारी ग्रुप ग्रामपंचायत नांदगांव मालमत्ता क्र. ११२२ क्षेत्र २७७२ चौ. फुट ही घर मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक : २७/०७/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या शेती मिळकतीचे विद्यमान मालक रायोमंड केकी पटेल यांच्या मालकीचे क्षेत्रामधील क्षेत्र खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकारणी रू.पैसे. |
|---|---|---|
| २०५/२ | ०६-३४-०० | ११-४८ |

सदर मिळकतीमधील विद्यमान मालक रायोमंड केकी पटेल यांचे मालकी व ताबा वहिवाटीतील ०५-४५-२० हे.आर.चौ.मी. क्षेत्र, आकारणी रू. ९-८७ पैसे पैकी ००-२०-६० हे.आर.चौ.मी.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २८/०७/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, विद्यमान जमीन मालक, राजीव भारद्वाज यांच्या ताबेकब्जातील, वहीवाटीतील, त्यांच्या मालकी हक्कात असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करणेचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे गारपोली ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| भूमापन क्र | उपविभाग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.चौ.मी. | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.चौ.मी. | क्षेत्र: एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | - | ०-३२-४० | ०-०३-५० | ०-३५-९० | १.५६ |

वरील वर्णनाच्या जमीनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहीवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजणे येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक : २७/०७/२०२६

**ॲड. अतुल तुकाराम भोपी**
कार्यालय :- १०४, साई लिला, माणेक नगर को-ऑप.
हौ. सोसायटी समोर, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी,
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.
मो.नं. ९३२४६७९५०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे देऊळवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मेसर्स साईकृपा डेव्हलपर्स तर्फे | ८३ | २१ | ०-२८-०० | ० | १४ |
| १)श्री.मनसुख तेजाभाई टिंबाडीया<br>२)श्री.रतिलाल वशरामभाई पटोडीया | ८३ | २४ | ०-१५-०० | ० | ०८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ ई मेल : adv.jayeshmhase@gmail.com

सही/-
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : २८/०७/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. कविता विकास शिंदे, पत्ता- सदनिका नं. ००१, तळमजला, बी विंग, आदिती निर्माण को. ऑप. हौ. सोसा. लि. निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०१०१, यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मोहिली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. हरिश्चंद्र बाबु दुर्गे | ४/८ | ००-१५-९०<br>पो.ख. ००-००-५०<br>एकुण ००-१६-४० | २-७५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २८/०७/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

येणेकरून सर्वांना कळविण्यात येते की खालील अनुसूचीत नमूद मालमत्ता विकत घेण्याचा प्रस्ताव आहे.

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा प्राधिकरणास विक्री, करार, ताबा, गहाण, हक्क, भाडेपट्टा, वारसा, देणगी, तारण, इजमेंट, लियन, प्रलंबित दावा (lis pendens) किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क/दावा असल्यास त्यांनी संबंधित कागदपत्रांसह लेखी हरकती या जाहीर सूचनेच्या प्रसिद्धीपासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यास कळवाव्यात.

निर्धारित मुदतीत हरकत नोंदवली नाही तर संबंधित सर्व दावे सोडून दिले/रद्द (waived) समजले जातील व व्यवहार कोणतीही पुढील सूचना न देता पूर्ण करण्यात येईल. उशिराने आलेले दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत व त्याबाबत संबंधित व्यक्ती जबाबदार राहील.

ही सूचना सर्वांसाठी बाध्यकारी (constructive notice) समजण्यात येईल.

गाव नवघर/पाली, ता. सुधागड, जि. रायगड (महाराष्ट्र) येथील जमीन:

. गट क्र. ३९९-२ हे. ०७ आर.
. गट क्र. ४००-१ हे. २३ आर.
. गट क्र. ४०१-३ हे. २८ आर.

सदर जमिनीवरील सर्व हक्कांसह.

जाहिर सूचनेच्या प्रसिद्धीसाठी मान्यता दिली आहे.

मिलिंद भिकू शेळके

सही /-
**मे.बी अँड बी. इन्फिनाईट असेट्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड**
**श्री.भाविक लहरीकांत भद्रा**
पत्ता : १०५. पहिला मजला, हॉलमार्क बिझनेस पार्क,
गुरुनानक हॉस्पिटल रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१.
मोबा. नं.: ९९९९१६९०००१
ई मेल:BBINFINITEASSETS@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. विजय पांडुरंग म्हात्रे हे त्यांच्या मालकीच्या व ताबेकब्जाच्या मौजे कोळगांव भूमापन क्रमांक व उपविभाग २८० या शेत जमीन मिळकतीमधून मेसर्स टेरामरीन इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपी यांना त्यांच्या मालकीच्या मौजे कोळगांव भूमापन क्रमांक व उपविभाग २८५ या शेत जमीन मिळकतीमध्ये जाण्यायेण्याकरीता निरंतर वहिवाटीचा रस्ता देण्याचा व्यवहार त्यांच्यात ठरलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कोळगांव | २८० | ०-२१-००<br>पैकी ०-०१-५० | ४-८१ |

तरी सदर निरंतर वहिवाटीचा रस्ता देण्याच्या व्यवहारासंबंधी कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आंत खाली सही करणार यांच्या कार्यालयामध्ये कागदोपत्री पुराव्यानिशी सादर करावी. जर उक्त मुदतीत कोणाचीही हरकत आली नाहीतर आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील व उक्त मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २७-०७-२०२६

सही/-
**(ॲड. विकास हरिश्चंद्र पाटील)**
युगंधर सोसा. शॉप नं. ०६,
युनियन बँकेशेजारी, ब्राम्हण आळी,
अलिबाग, जिल्हा-रायगड.
मो- ७७९८८४४४३३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे उमटे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली शेती मिळकत त्यामधील ग्रामपंचायत बोरघर मालमत्ता क्र. ६८९ क्षेत्र २३४ चौ.फूट, यासह त्यांचे विद्यमान मालक श्री. विनय विकास पाटील यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ४८/२ | ०१-१२-२० | २३.५६ |

आणि त्यामधील ग्रामपंचायत बोरघर, ता. अलिबाग मालमत्ता क्र.६८९ चे घर क्षेत्र २३४ चौ.फूट सहीत

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २८/०७/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड

दिनांक : २८ जुलै २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-पाचखडकवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| निरज नाथ<br>सुनिल रामराव पारसकर | २२ | १ | ३-६१-०० | २ | ४४ |
| | यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-२३-९० व ०-४१-२४-० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-मु.पो.कशेळे,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,

सही /-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२८/०७/२०२६

## निवडक



### गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**आपटा :** रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि रो. डॉ. धीरज जैन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून परिसरातील १३४ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लाडीवली कातकरवाडी, महिला उद्योग मंडळ शाळा पराडे तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चावणे येथील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या उपक्रमासाठी रो. डॉ. धीरज जैन आणि रो. अमित शाह यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष रो. देवेंद्र महिंद्रकर, सचिव रो. नागेश कदम, सेवा प्रकल्प अध्यक्ष रो. गणेश काळे, खजिनदार रो. अमित शाह, रो. शशिकांत शानबाग, रो. धीरज जैन, डॉ. प्रतिभा महिंद्रकर आणि डॉ. स्विटी जैन यांच्यासह रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

### मेडिकोज अध्यक्षपदी डॉ. तझीन राहटविलकर बिनविरोध

**माणगाव :** माणगाव मेडिकोजच्या अध्यक्षपदी अल्फा हॉस्पिटलच्या त्वचारोगतज्ज्ञ डॉ. तझीन इस्माईल राहटविलकर



यांची बिनविरोध निवड करण्यात आली. गारळफाटा येथील हॉटेल आनंद भुवनच्या सभागृहात झालेल्या मेडिकोजच्या वार्षिक सभेत ही निवड झाली. निवडीनंतर उपस्थित डॉक्टरांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. तझीन राहटविलकर यांचे अभिनंदन केले. माणगाव शहरातील मोर्बा रोडवरील खांदाड गावच्या हद्दीत असलेल्या अल्फा हॉस्पिटलचे डॉक्टर व सामाजिक कार्यकर्ते डॉ. इस्माईल राहटविलकर यांच्या त्या पत्नी आहेत. डॉ. तझीन राहटविलकर या रुग्णसेवेबरोबरच सामाजिक व शैक्षणिक कार्यातही सक्रिय आहेत. त्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीच्या सदस्या म्हणूनही कार्यरत आहेत. अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. तझीन राहटविलकर यांनी मेडिकोजच्या सर्व सभासदांचे आभार मानले. मिळालेल्या संधीचे निश्चितच सोने करीन. सर्वांना सोबत घेऊन विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यावर भर देणार आहे. जनसेवा आणि रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून माणगाव मेडिकोजचे कार्य जिल्ह्यात पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे त्यांनी सांगितले. डॉ. तझीन राहटविलकर यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



### ‘ईट प्ले रीड’, ‘दोस्त मुंबई’ची प्रेरणादायी भेट

**नवीन पनवेल :** आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत धन्वंतरीज ऑर्गनायझेशन फॉर सोशिओ हेल्थ ट्रान्सफॉर्मेशन (दोस्त मुंबई) आणि ‘ईट प्ले रीड’ या समाजाभिमुख संस्थांची प्रेरणादायी भेट झाली. या भेटीतून सामाजिक एकात्मता, आरोग्य जागृती आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

दोस्त मुंबईचे संस्थापक डॉ. कैलाश जवादे, अध्यक्ष डॉ. वैशाली जवादे आणि जनसंपर्क अधिकारी श्रीकांत गावित हे गेल्या २४ वर्षांपासून ग्रामीण तसेच शहरी भागात अवयवदान, आरोग्यसेवा आणि सामाजिक जनजागृतीसाठी कार्यरत आहेत. गेल्या १२ वर्षांपासून संस्थेच्या माध्यमातून पंढरपूर वारीत अवयवदान व आरोग्यसेवा दिंडी सातत्याने काढली जात आहे. यंदाच्या वारीदरम्यान ‘ईट प्ले रीड’च्या संस्थापक अपर्णा शहा यांच्याशी विशेष भेट झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे राजदूत या उपक्रमात सहभागी झाले. ‘खा, खेळा, वाचा’ या घोषवाक्याच्या माध्यमातून वाचनाची आवड, आरोग्याची काळजी आणि आनंदी जीवनशैलीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. अपर्णा शहा यांच्या पुढाकाराने आणि ‘दोस्त मुंबई’च्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या जनजागृती उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या भेटीमुळे भविष्यात सामाजिक उपक्रमांमध्ये संयुक्त सहभाग, जनहिताच्या योजना आणि सकारात्मक सामाजिक परिवर्तनासाठी दोन्ही संस्थांमध्ये सहकार्याची नवी दिशा निर्माण झाली आहे.



# लढायला तयार व्हा, काळ आपलाच आहे

■ चित्रलेखा पाटील यांचा निर्धार

■ शेकापची विचारधारा तरुणांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन

भरतकुमार कांबळे
| पनवेल |

तरुणाईला बदल हवा आहे आणि तो बदल घडविण्याची ताकद आपल्यात आहे. मात्र, त्यासाठी एकजुटीने लढायला तयार व्हा; काळ आपलाच आहे, असा जोशपूर्ण निर्धार शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला. जेन झीच्या आंदोलनातून मिळालेली ऊर्जा आगामी काळात पक्षाच्या कार्यकर्त्यांना नवी दिशा देईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी तरुणाईशी जोडले जाण्याचे आवाहन केले.

पनवेल येथील शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात सोमवार, दि. २७ जुलै रोजी पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित प्रमुख कार्यकर्त्यांच्या सभेत त्या बोलत होत्या. यावेळी पक्षाची विचारधारा आणि कार्यप्रणाली सोशल मीडिया माध्यमातून तरुणांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, शेतकरी कामगार पक्षाबद्दल आजही सर्वसामान्यांच्या मनात विश्वास आणि आपुलकी आहे. जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान सोनम वांगचुक आणि जेन झीच्या आंदोलकांची भेट घेतली असता, तेथील महाराष्ट्रातील माध्यम प्रतिनिधींनी शेकापची स्वच्छ प्रतिमा आजही कायम असल्याचे सांगितले. ही पक्षासाठी अभिमानाची बाब आहे. याच विश्वासाच्या बळावर तरुणांच्या मनाचा ठाव घेण्याची गरज आहे. जेन झीच्या आंदोलनाने आपल्यासारख्या कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा दिली असून, त्यातून प्रेरणा घेऊन पुन्हा एकजुटीने कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शैलाताई पाटील, कामगार आघाडीचे नेते प्रदीप नाईक, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देवेंद्र मढवी, माजी सभापती नारायण घरत, पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, शेकापचे पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी, महानगर जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक आणि प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी नारायण घरत यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. सभेच्या समारोपावेळी प्रकाश म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी वर्धापन दिनाच्या निमित्ताने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करून जनतेच्या प्रश्नांसाठी अधिक आक्रमकपणे मैदानात उतरण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

> **पद नसले तरी जनतेसाठी काम करा : ॲड. मानसी म्हात्रे**
> यावेळी शेकाप राज्य महिला आघाडीच्या अध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी पनवेल युनिटच्या कार्याचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांची ताकद पनवेलमध्ये ज्या पद्धतीने काम करते आहे, त्याचा आदर्श इतरांनी घ्यायला हवा. पद नसतानाही जनतेची कामे कशी करून दाखवायची, हे पनवेलकरांनी सिद्ध केले आहे. पद नसल्याचा न्यूनगंड न बाळगता कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे. सध्या पक्षाची काहीशी पिछेहाट झाली असली तरी आगामी काळ आपलाच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> **शेकाप हा लढवय्यांचा पक्ष : सुरेश खैरे**
> शेकापचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी वर्धापन दिनाच्या तयारीचा आढावा घेत कार्यकर्त्यांना नव्या जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले. शेतकरी कामगार पक्ष हा लढवय्यांचा पक्ष आहे. शेकापच्या बहाद्दर शिलेदारांनी कधीही पदाची लालसा धरली नाही. उलट, पदाला लाथ मारून जनतेसाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी त्यांनी दाखवली. त्यामुळेच आजही सर्वसामान्य जनता पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, असे त्यांनी सांगितले.





# वर्षभरातच काँक्रिट रस्त्याची चाळण

■ बेलकडे-सहाण मार्गावर मोठमोठे खड्डे

■ निकृष्ट कामामुळे अपघाताचा धोका वाढला

| चौल | प्रतिनिधी |

अजून रस्त्याचे काम पूर्णही झालेले नाही, तोवरच नव्याने तयार केलेल्या बेलकडे-सहाण मार्गाची अक्षरशः चाळण झाली आहे. वर्षभराचा कालावधीही पूर्ण झालेला नसताना सिमेंट काँक्रिटीकरण केलेल्या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने कामाच्या दर्जावरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाहनचालकांना या खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला असून, रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम एमएसआयडीसीकडून करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग असलेल्या बेलकडे ते सहाण बायपास रस्त्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. मात्र, रस्ता पूर्णत्वास जाण्यापूर्वीच त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. बेलकडे ते सहाणदरम्यान अनेक ठिकाणी रस्त्याची अवस्था खराब झाली आहे. अचानक आलेल्या खड्ड्यांमुळे वाहने आदळत असून, वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे. रात्रीच्या वेळी खड्डे स्पष्ट दिसत नसल्याने अपघाताचा धोका आणखी वाढला आहे. नवीन रस्ता तयार होताच त्याची अशी दुरवस्था होत असेल, तर कामाच्या दर्जाची तपासणी नेमकी कुणी केली? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. निकृष्ट कामाची चौकशी करावी आणि आवश्यक त्या ठिकाणी दर्जेदार पद्धतीने दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, या खड्ड्यांमुळे एखादा मोठा अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

### वृद्धाची फसवणूक

| पनवेल | प्रतिनिधी |

गॅस कनेक्शन बंद होण्याची भीती दाखवत सायबर भामट्यांनी खांदा कॉलनीतील सुभाष बाबाराव तारे (वय ७०) यांची तब्बल ५ लाख २८ हजार ३६४ रुपयांची ऑनलाइन फसवणूक केली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर भामट्यांविरोधात गुन्हा दाखलकेला आहे. तारे यांच्या मोबाईलवर ‘डिअर पाइपलाइन एमजीएल गॅस युजर’ असा संदेश पाठवून मागील महिन्याचे मीटर रीडिंग अद्ययावत झाले नसल्याचे सांगण्यात आले. रात्री ९.३० वाजता गॅस कनेक्शन बंद होईल, अशी भीती दाखवत ‘बिल अपडेट ऑफिसर’च्या नावाने दिलेल्या क्रमांकावर संपर्क करण्यास सांगण्यात आले.

# नेरळ-माथेरान घाटात भलामोठा दगड रस्त्यावर

**बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे अपघाताचा धोका; तातडीने दगड हटविण्याची मागणी**

| नेरळ | प्रतिनिधी |

थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये पावसाळी पर्यटनासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत असतानाच नेरळ-माथेरान घाटरस्त्यावर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. माथेरानवरून नेरळकडे येताना वॉटर पाइप स्टेशन परिसरात भलामोठा दगड रस्त्यावर कोसळला असून, त्याने रस्त्याचा जवळपास अर्धा भाग व्यापला आहे. विशेष म्हणजे, हा दगड एका छोट्या दगडाला अडकून राहिल्याने तो कधीही खाली घसरून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



माथेरानला जाण्यासाठी नेरळ-माथेरान घाटरस्ता हा प्रमुख आणि एकमेव रस्ता आहे. पावसाळ्यात माथेरानचे आल्हाददायक वातावरण, धुक्याची चादर आणि हिरवाई अनुभवण्यासाठी दररोज मोठ्या संख्येने पर्यटक येथे दाखल होतात. शनिवार-रविवारी तर पर्यटकांच्या वाहनांमुळे घाटरस्ता अक्षरशः गजबजून जातो. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे घाट परिसरातील डोंगर उताराची माती ठिसूळ झाली असून, ठिकठिकाणी लहान-मोठ्या दरडी आणि दगड रस्त्यावर येण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे घाटातून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

वॉटर पाइप स्टेशन परिसरात रस्त्यावर आलेला हा भलामोठा दगड सध्या वाहनचालकांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. दगडाचा काही भाग रस्त्यावर असल्याने वाहनांना तो चुकवून मार्ग काढावा लागत आहे. त्यातच हा दगड ज्या छोट्या दगडाला अडकून राहिला आहे, तो आधार निसटल्यास दगड थेट रस्त्यावरून खाली घसरू शकतो. त्यावेळी एखादे वाहन तेथून जात असल्यास मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेचे चालक या घाटरस्त्यावर नियमित प्रवास करत असल्याने अशा कठीण परिस्थितीतही पर्यटकांना सेवा देत आहेत. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे एखाद्या मोठ्या दुर्घटनेनंतरच जाग येणार का, असा सवाल वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.पर्यटकांची आणि स्थानिक वाहनचालकांची सुरक्षा लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने हा भलामोठा दगड हटवावा तसेच घाटरस्त्याची पाहणी करून धोकादायक ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### खारपाले शाळेला ‘आरओ’ वॉटर प्युरिफायर भेट

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

सखे सारथी चॅरिटेबल ट्रस्ट आणि समाजसेविका शैला प्रमोद तुरे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, दि. २६ रोजी खारपाले येथील जिल्हा परिषद शाळेत सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने शाळेला ‘आरओ’ वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला.

यावेळी इयत्ता दहावीमध्ये उल्लेखनीय गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या पाच गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच आगामी शैक्षणिक वर्षात दहावीमध्ये सर्वाधिक टक्केवारी मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला २६ जानेवारी रोजी सायकल बक्षीस देण्यात येईल, अशी घोषणा शैला तुरे यांनी केली. कार्यक्रमाला सखे सारथी चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष डॉ. अलका मोहन कदम, सचिव डॉ. श्रुती कदम, खजिनदार अंजना खंदारे, मुख्य कार्यवाहक कविता बोराडे, नथुराम मगरे, मुख्याध्यापक जनार्दन मोकळ, शिक्षिका विनिता दपके, कुंदा निर्गुणडा, मधुमती मढवी, शाळा समितीचे अध्यक्ष नारायण गायकर, उपाध्यक्ष प्रीती पाटील, सरपंच कविता गावंड, उपसरपंच पांडुरंग तुरे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# अनुसूचित जमातीच्या बांधवांना दिलासा

■ जात दाखले, जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग सुकर

■ कोळी महासंघाच्या मागणीनंतर सरकारकडून समिती गठित

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

अनुसूचित जमातीतील बांधवांना जात दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळावे, तसेच रक्ताच्या नात्यातील समाजबांधवांना जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतच्या मागणीचा अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने समिती गठित केली आहे. यासंदर्भात इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शासन आदेश निर्गमित करण्यात आल्याने अनुसूचित जमातीतील बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.



जात दाखले व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रश्नावर कोळी महासंघासह अन्यायग्रस्त जमातींच्या विविध संघटनांनी जळगाव, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, बुलढाणा तसेच रायगड जिल्ह्यात आंदोलन केले होते. काही दिवसांपूर्वी कोळी महासंघाच्या वतीने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन दि. २० ऑक्टोबर २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासनाने तातडीने निर्णय घ्यावा; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला होता.

या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली असून, त्यांच्या मान्यतेने समिती गठित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. कोळी महासंघाचे अध्यक्ष व आमदार रमेशदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ॲड. चेतन पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. समितीच्या निर्णयामुळे अनुसूचित जमातीतील बांधवांना जात दाखले व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग अधिक सुकर होऊन त्यांना न्याय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**‘आरोग्याची वारी पंढरीच्या दारी’चा स्तुत्य उपक्रम | वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी**

# पनवेलमधील डॉक्टरांची पंढरपुरात आरोग्य सेवा

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल येथील डॉक्टरांची एक प्रगतशील संघटना ‘पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन’ यांच्यावतीने संघटनेचे अध्यक्ष डॉ वैभव मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली ‘आरोग्याची वारी पंढरीच्या दारी’ हे घोषवाक्य घेऊन आषाढी एकादशीचे औचित्य साधून पंढरपूर येथे वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत औषध वाटपाचा कार्यक्रम पार पडला. पनवेल डॉक्टर्स जनरल



प्रॅक्टीस्टर असोसिएशनचे हे चौथे वर्ष असून, यामधून डॉक्टर्सना मोठे मानसिक समाधान मिळत असल्याचे पहावयास मिळाले.

पनवेलमधील डॉक्टरांना स्वतःच्या व्यवसायाचा ताण कमी करण्यासाठी पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनच्या वतीने या वारीची सुरुवात पनवेलमधील डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली. प्रथमतः प्रतिबालाजी नारायणपूर येथे नारायण महाराजांचे दर्शन आणि सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण रामा पाटील यांच्यावतीने प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसादाचा लाभ घेतला. जेजुरी येथे खंडोबारायाचे दर्शन, त्यानंतर मोरगावच्या गणपतीचे दर्शन घेऊन ही सर्व डॉक्टर मंडळी अकलूज येथे डॉ. विवेक देवकाते यांच्या घरी मुक्कामाला थांबली होती. आणि २५ जुलै रोजी सकाळी पंढरपूर येथे रायगड वारकरी भवन या ठिकाणी गणेश महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी भवांमध्ये वारकऱ्यांसाठी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मोफत तपासणी आणि मोफत औषधोपचार अशी सेवा करण्यात आली.

सलग चौथ्या वर्षी करण्यात आलेल्या या वारीचे यशस्वी आयोजन पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वैभव मोकल, उपाध्यक्ष डॉ वैष्णवी नाईक, सहखजिनदार डॉ. सुदर्शन मेटकर, डॉ. वैभव पाटील, डॉ. स्वप्नील लोखंडे, डॉ. आशिष गांधी डॉ. नरेश पाटील, डॉ. राजेश गांधी, डॉ. रसिका पाटील, डॉ. स्वप्नील बाविस्कर, डॉ. अमित दवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मेहनत घेऊन ही वारी यशस्वी केली.

### गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत जनजागृती



| चिरनेर | प्रतिनिधी |

विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्सच्या महिला विकास कक्ष आणि इनर व्हील क्लब ऑफ चेंबूर टियारा, डिस्ट्रिक्ट ३१४ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘प्रतिबंध करा, तपासणी करा, संरक्षण करा’ या संकल्पनेवर आधारित गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. युवक-युवतींमध्ये या आजाराचा प्रतिबंध, एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व आणि वेळेवर तपासणीबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाला १९२ विद्यार्थी, प्राध्यापक आणि इनर व्हील क्लबचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच इनर व्हील झोन ४ मधील सुमारे ३० सदस्यांनीही सहभाग घेतला. ज्येष्ठ प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मीनाक्षी राव (एमबीबीएस, एमडी, डीजीओ) यांनी मार्गदर्शन करताना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची कारणे, लक्षणे आणि जोखीम घटक याबाबत सविस्तर माहिती दिली.

# धावाधावीचे नाटक

झुरळांच्या आंदोलनाने मोदी सरकारला असे काही हलवले आहे की, आता सरकार रोज एक नवीन घोषणा करीत आहे. एक दिवस दहा कोटी रुपये दंड आणि दहा वर्षांची शिक्षा असलेला कायदा, दुसऱ्या दिवशी नीटची परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या ४७ लोकांना एकदम हाकलून देणे असे धावाधावीचे नाटक जोरात चालू आहे. रविवारी एका नव्या टास्क फोर्सची घोषणा करण्यात आली. गंमत म्हणजे या सर्व घोषणा खुद्द मोदी करतात. त्यांच्या सरकारचे प्रवक्ते नाहीत किंवा आता जे नवीन शिक्षणमंत्री म्हणून बसवले आहेत ते प्रल्हाद जोशी वगैरे नाहीत. एकूणच, मोदी या देशाचा राजा आहे हे ठसवण्याचे काम जोरात सुरु असते. असो. नीट वगैरेंसारख्या परीक्षांमधील सुधारणांसाठी टास्क फोर्स काम करणार आहे. नंदन निलेकणी हे तिचे प्रमुख असणार आहेत. हे निलेकणी तेच ज्यांनी आधार कार्ड भारताला दिले. या कार्डाचे उपयोग बरेच आहेत. पण मोदींसारख्यांना त्याचे दुरुपयोगही करता आले. आता आधारचा फोटो, तुमचे अंगठ्याचे ठसे आणि डोळ्यांच्या बाहुलीचा फोटो यामुळे जगात कुठेही तुम्ही असाल तर एका मिनिटात ओळखता येते. ही माहिती सरकारकडे आहे. त्यामुळे तुम्ही एखाद्या मोर्चात सहभागी झालात तर लांबूनच तुमचा फोटो काढला जाऊ शकतो आणि सरकारकडच्या माहितीशी तो ताडून पाहिला जातो. तुम्ही सरकारविरोधी आहात असं ठरवलं जाऊ शकतं आणि तुमच्यावर कुठेही कारवाई होऊ शकते. मतदारयादीतून तुमचं नाव काढलं जाऊ शकतं. हे बंगालमध्ये घडलं आहे. परवा दिल्लीवर जंतरमंतरवर अशा प्रकारचे फोटो काढण्याचे रीतसर कॅमेरे दिल्ली पोलिसांनी लावले होते. त्याविषयी ओरडा होऊनही ते मागे घेण्यात आले नाहीत. या सर्वांना निलेकणी यांना जबाबदार धरण्याचे कारण नाही. पण निलेकणींसारखा माणूस हे तंत्रज्ञान घातक रीतीने वापरणाऱ्या राजवटीसोबत काम करणार आहे हे लक्षात ठेवायला हवे. निलेकणी यांच्यासोबत इस्रोचे माजी अध्यक्ष, आयआयटीचे माजी संचालक इत्यादी मंडळीही यात आहेत.

### काळाबाजार थांबणार नाही

मोदी सरकारचा एकूण दृष्टिकोन असा आहे की, नीटचे पेपर फुटले हा काहीतरी तांत्रिक प्रश्न आहे. त्याच्यात पोलिसी पध्दतीच्या सुधारणा ते करू पाहत आहेत. म्हणजे पेपर फुटू नये म्हणून सर्व परीक्षा संगणकावर घ्यायच्या. पण आजच्या काळात हा उपायही पुरेसा नाही हे आजूबाजूला दिसते आहे. निलेकणीबाबांनी बनवलेल्या आधार कार्डाचेच अनेक घोटाळे आहेत. लोकांचे बोटांचे ठसे जुळत नाहीत अशा तक्रारी आहेत. बनावट आधार कार्डे हा तर भारतभरचा प्रश्न आहे. बँकांचे व्यवहार संगणकावर करण्यात आले. तरीही लोकांच्या बँक खात्यातून पैसे लंपास करण्याचे प्रकार घडतातच. चोर हा नेहमीच पोलिसांच्या दोन पावले पुढे असतो असे म्हणतात. त्यानुसार, बँकाची खाती हॅक करण्याचे तंत्रही चोरांनी शोधून काढले आहे. त्यामुळे संगणकाची कुलुपे लावली म्हणून ती तोडता येणार नाहीत असे होत नसते. अशी कुलुपे लावावीत व व्यवस्था अधिक भक्कम करावी हे बरोबर. त्या दृष्टीने निलेकणी आणि मंडळींचा उपयोग जरूर होईल व करूनही घ्यावा. पण हाच मूळ प्रश्नावरचा अक्सीर इलाज आहे असे समजू नये किंवा लोकांमध्ये तसा प्रचार करू नये. पण मोदींना तूर्तास मुलांचा राग शांत करायचाय. पळवाट शोधायचीय. ते झाले की आपण पुन्हा गाडी हिंदू विरुध्द मुस्लिम रस्त्यावर नेऊ आणि सगळे काही ठीक होईल असे त्यांना वाटत असावे. मुळात नीटच्या पेपरची फोडाफोडी होते कारण डॉक्टरी या व्यवसायाला आपल्याकडे असलेली प्रतिष्ठा आणि भरपूर पैसे मिळवण्याची तहहयात हमी. आज इंजिनिअरिंग केलेल्यांना नोकऱ्या नाहीत असे चित्र सर्रास दिसते. पण डॉक्टर्सचे तसे नाही. त्यांना कायमच मागणी असते. आजकाल नवी प्रॅक्टिस सुरु करणे कठीण असेल. पण कॉर्पोरेट इस्पितळांमध्ये नोकऱ्या मिळणे सोपे आहे. किंबहुना, अशांमध्ये डॉक्टरांना प्रचंड मागणी आहे. यामुळेच वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीच्या जागा केवळ सव्वा लाखांच्या आसपास असताना त्यासाठी नीटची पूर्वपरीक्षा देणाऱ्यांची संख्या बावीस लाखांच्या घरात असते. मागणी आणि पुरवठा यांच्यात इतकी तफावत पडली की गैरधंदे करणाऱ्यांना तिथे संधी निर्माण होते. एकेकाळी सिनेमाच्या तिकिटांचा काळाबाजार होत असे. आता ओटीटीने सिनेमाचा आणि या काळ्या बाजाराचाही धंदा बसला. सध्या डॉक्टरीच्या अभ्यासक्रमाच्या जागा कमी असल्याने त्यांचा काळाबाजार होतो व त्यातूनच मग पेपर फोडाफोडी होते. उद्या संगणकाची कुलुपे लागली तर हा काळाबाजार वेगळ्या मार्गाने होईल, इतकेच.

### आधी अक्कल कुठे होती

तेव्हा, मुख्य प्रश्न हा शिक्षणाच्या एकूण व्यवस्थेत मूलभूत सुधारणा करण्याचा आहे. नीटचा अभ्यास करणारी व परीक्षा देणारी सर्वच मुले कष्टाळू, अभ्यासू आणि हुशार असणार यात शंका नाही. डॉक्टरकीइतकीच प्रतिष्ठा व पैसा समजा संशोधनाच्या क्षेत्राला दिली गेली तर ही हुशार मुले तिकडे वळतील. पण मोदी सरकारला खऱ्या संशोधनाचे वावडे आहे. आहेत त्या संस्थांचा पैसा कमी केला जात आहे. गोमूत्र आणि गायीच्या शेणावर संशोधनासाठी मात्र समित्या बसवून त्यांच्यावर पैसे उधळले जात आहेत. शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्यांना विविध क्षेत्रांमध्ये भरपूर रोजगार मिळणे हा आजच्या घडीचा कळीचा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्याविषयी न बोलता मोदी भलत्याच गोष्टींवर बोलत आहेत. पेपरफुटीविरोधी कायदे पूर्वीही होतेच. पण मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या काळात केवळ दोन प्रकरणांमध्ये आरोपींना शिक्षा झाली आहे. उत्तर प्रदेशामध्ये तर पेपरफुटीत आरोपी असलेले लोक आता आमदार झाले आहेत. त्यामुळे अधिकाधिक कडक शिक्षा हे मूळ प्रश्नावरचे उत्तर नाही. ती फसवणूक आणि दिशाभूल आहे. दुसरे म्हणजे आपल्या परीक्षा पध्दतीत मूलभूत सुधारणा करण्याची गरज आहे. आपले शिक्षण घोकंपट्टी किंवा रट्टा मारणे यावर आधारलेले आहे. गाईडे पाठ करून मुले पास होत जातात. पण त्यांना काहीही येत नाही. प्रश्नांचा विचार करण्याची सवयच लावली जात नाही. हे बदलण्यासाठी मोदींनी काहीही केलेले नाही. उलट त्यांच्या राजवटीत हिंदू धर्माचा खोटा उदोउदो, भारताचा खोटा इतिहास वगैरेंनाच प्रतिष्ठा मिळाली आहे. सांगितले ते गपगुमान ऐकायचे असा मोदींचा आविर्भाव असतो. शिवाय सगळी अक्कल आपल्यालाच आहे, आपल्यावर सर्व जनता फिदा आहे असेही काही गैरसमज या सरकारमध्ये आहेत. जंतरमंतरवर ते मोडून पडले तरी यांची अक्कल ठिकाणावर आलेली नाही. नीट परीक्षा घेणाऱ्या एनटीएमधील ४७ लोकांना हाकलले. त्यांना नेमके का काढले आणि हाकलायचेच होते तर आंदोलनाच्या आधी ही कारवाई का केली नाही याचे काही उत्तर नाही. पण आता कारवाई केल्यानंतर वाह, मोदी वाह असे म्हणावे अशी यांची अपेक्षा आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे इतका सगळा घोषणांचा पाऊस आता पाडण्यापेक्षा कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलकांशी सरकारने तब्बल एक महिनाभर चर्चा का केली नाही याचा अंधभक्तांनी कधी तरी विचार करावा आणि संधी मिळेल तेव्हा मोदींना तसा प्रश्न करावा.

**विचार**

# निसर्गाचा कोप की मानवी लोभ?

***निसर्गाचे बदलते रूप केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग'चे अपत्य नाही, तर ते आपण विकासाच्या नावाखाली केलेल्या पर्यावरणाच्या कत्तलीचे आणि नियोजनाच्या नावाने चालवलेल्या अनागोंदीचे थेट फलित आहे. मुंबई, पुणे, बंगळुरूसारखी महानगरे पाण्याखाली जाणे, सह्याद्रीचा कणा ढासळणे आणि नद्या शहरात घुसणे ही आता निसर्गाची नव्हे, तर माणसाने ओढवून घेतलेली मानवनिर्मित आपत्ती बनली आहे.***



**प्रा. भास्कर खंडागळे**

पर्जन्यराजाचे आगमन झाले, की एके काळी बळीराजाच्या डोळ्यात कृतज्ञतेचे प्रबोधन व्हायचे आणि चाकरमान्यांच्या मनात आनंदाचे तरंग उमटायचे; पण आज परिस्थिती बदलली आहे. आता मॉन्सून येतो तो 'आनंद' घेऊन नाही, तर 'धडकी' भरवून... हवामान विभागाने जाहीर केलेल्या देशाच्या मॉन्सून नकाशावर नजर टाकली, तर संपूर्ण देश एका विचित्र हवामान विसंगतीच्या विळख्यात अडकलेला दिसतो. कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे जलप्रलय! 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सून सुरुवातीला रेंगाळला, देशातील बहुतांश राज्ये कोरडी राहिली, तर दुसरीकडे अवघ्या काही दिवसांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडून शहरांची आणि नद्यांची दुरवस्था झाली. आज देशातील प्रत्येक मोठे शहर पहिल्याच मुसळधार पावसात 'बेटा'चे स्वरूप धारण करते. शहरे का तुंबतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी फार मोठ्या तज्ज्ञांची गरज नाही. याचे मूळ आपल्या चुकीच्या नागरीकरणात आणि काँक्रीटीकरणाच्या अघोरी हव्यासात दडलेले आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण शहरांमधील मातीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने गाडून टाकला आहे. पूर्वी पडणारा पाऊस जमिनीमध्ये जिरायचा. त्यामुळे भूजल पातळी वाढायची आणि पाण्याचा प्रवाह संथ व्हायचा. आज शहरांमध्ये माती उरलीच नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब थेट रस्त्यावर येतो. काँक्रीटीकरणामुळे पाण्याचा नैसर्गिक निचराच पूर्णपणे बंद झाला आहे. त्यात भर पडली आहे ती आपल्या निकृष्ट ड्रेनेज सिस्टीमची. ब्रिटिश काळात किंवा त्यापूर्वी बांधलेल्या वाहिन्यांवर आज कोट्यवधींच्या लोकसंख्येचा आणि सिमेंटच्या जंगलाचा भार टाकला जात आहे. परिणामी, पुढील आक्रीत ओढवते.

कचरा, प्लास्टिक आणि गाळाने तुंबलेले नाले आणि गटारे एवढ्या प्रचंड पाण्याचा भार पेलू शकत नाहीत. परिणामी, रस्ते हेच नद्या बनतात आणि चकचकीत महानगरे काही तासांमध्येच दलदलीत रूपांतरित होतात. बंगळुरू आणि पुणे ही देशातील 'आयटी हब' आणि शिक्षणाची माहेरघरे म्हणून ओळखली जाणारी शहरे आज पूरपरिस्थितीचे सर्वात मोठे बळी ठरत आहेत. या शहरांचा भूगोल पाहिला तर लक्षात येईल, की बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेने मिळून शहरांचा गळा घोटला आहे. पुणे असो वा बंगळुरू; इथे नैसर्गिक ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषा बुडवून टोलेजंग इमारती, 'आयटी पार्क' आणि गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. बंगळुरूसारख्या शहरात पूर्वी शेकडो तलाव होते. ते एकमेकांशी नैसर्गिक नाल्यांनी जोडलेले होते. अतिरिक्त पाणी एका तलावातून दुसऱ्या तलावात वाहून जायचे. आज ते सर्व नाले आणि तलाव गिळंकृत करून त्यावर सिमेंटचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुण्यातही बंगळुरूची पुनरावृत्ती झाली आहे. मुळा-मुठा नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, रामनदी आणि इतर छोट्या ओढ्यांचे अस्तित्व मिटवून टाकल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरलेली नाही. माणूस पाण्याचा हक्काचा रस्ता अडवतो, तेव्हा पाणी माणसाच्या घरात घुसून आपला रस्ता शोधते, हेच या शहरांमधील पुराचे मुख्य कारण आहे. संस्कृतीचे आणि समृद्धीचे प्रतीक असणाऱ्या नद्या आता मानवी हस्तक्षेपामुळे संकटाचे कारण बनल्या आहेत.

यासंदर्भात मावळातून वाहणाऱ्या आणि पिंपरी-चिंचवड, पुण्याची तहान भागवणाऱ्या पवना नदीचे उदाहरण ताजे आहे. पवना नदीच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला, की धरणातून विसर्ग करावा लागतो; मात्र नदीपात्र अरुंद झाल्यामुळे आणि पात्रातच राडारोडा, बांधकामे झाल्यामुळे हे पाणी आजूबाजूच्या नागरी वस्त्यांमध्ये शिरते. यंदा पवना नदीला आलेल्या पुरामुळे शेकडो कुटुंबांना आपले घरदार सोडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. डोक्यावर संसार घेऊन, लहान मुलांना कडेवर काँक्रिटच्या महापुरातून वाट काढणाऱ्या नागरिकांची चित्रे मन सुन्न करणारी आहेत. हे स्थलांतर केवळ नैसर्गिक आपत्ती नाही, तर नदीच्या हद्दीत घुसखोरी करणाऱ्या व्यवस्थेने नागरिकांवर लादलेले मरण आहे. देहू, आळंदी परिसरातून वाहणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदीचा प्रकोपही यंदा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे केवळ शेतीचेच नुकसान झाले नाही, तर उद्योग आणि वाहतुकीचा कणा मोडला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकण आणि आसपासच्या परिसरात तीन-चार फूट पाणी साचल्याने अलिकडेच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. हा महामार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. इथे हजारो औद्योगिक कंपन्या आहेत; पण पाण्याचा निचरा होण्यासाठी महामार्गाच्या कडेला आवश्यक त्या वाहिन्याच तयार केल्या गेल्या नाहीत. आजूबाजूच्या टेकड्या आणि नैसर्गिक नाले बुजवून कंपन्या आणि व्यावसायिक गाळे उभारल्यामुळे महामार्गच एका मोठ्या धरणात रूपांतरित झाला. तीन-चार फूट पाण्यात अडकलेली वाहने आणि तासन्तास अडकून पडलेले हजारो नागरिक आपल्या ढिसाळ पायाभूत सुविधांचे विदारक दर्शन घडवून गेले.

शहरांची ही अवस्था असताना, महाराष्ट्राचे कवच मानल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वेगळेच आणि अत्यंत भीतीदायक संकट उभे राहिले आहे. महाबळेश्वर, ताम्हिणी, माळशेज, वरंधा आणि आंबेनळी घाटात दर वर्षी होणाऱ्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सह्याद्रीचा डोंगर खचत आहे, रस्ते वाहून जात आहेत आणि दरडी कोसळून निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. माळीणच्या आठवणी अजून ताज्या असताना आता मावळात पाटणची घटना सुन्न करणारी ठरली. पर्यटन आणि विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर चाललेली अंदाधुंद तोडफोड ही त्याची कारणे आहेत. रिसॉर्ट्स बांधण्यासाठी, रस्ते रुंदीकरणासाठी डोंगरांचे पायथे जेसीबी लावून उकरले जात आहेत. डोंगरांना धरून ठेवणारी झाडे नष्ट केली जात आहेत. यामुळे डोंगराची माती सैल होते आणि मुसळधार पाऊस झाला, की ती थेट खाली कोसळते. सह्याद्रीच्या पर्यावरणाशी चाललेला हा खेळ केवळ घाटापुरता मर्यादित नसून, संपूर्ण किनारपट्टी आणि दख्खनच्या पठाराला धोक्यात आणणारा आहे. या संपूर्ण प्रलयात सर्वात मोठी शोकांतिका पुढेच आहे. एका बाजूला शहरे पाण्यात बुडत असताना 'सेंट्रल वॉटर कमिशन'च्या अहवालानुसार देशातील प्रमुख १६६ धरणांमध्ये केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जलाशयांची पातळी सामान्यपेक्षा ४० ते ५० टक्क्यांनी खाली आहे. याचा अर्थ पडणारा पाऊस आपण साठवू शकत नाही. कमी कालावधीत जास्त पावसामुळे पाणी वेगाने वाहून जाते, महापूर येतो आणि पाणी समुद्राला मिळते

नीती आयोग म्हणतो, की २०३० पर्यंत देशातील २१ मोठ्या शहरांमधील भूमिगत पाणी संपुष्टात येईल. आपण आज पडणारे पाणी जमिनीखाली जिरवू शकलो नाही, तर पावसाळ्यात पुराच्या पाण्यात बुडणारी हीच शहरे उन्हाळ्यात पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभी असलेली दिसतील. आपण आताच सुधारलो नाही, तर डॉ. इस्माइल सेरागेल्डिन यांनी वर्तवलेले भाकीत खरे ठरेल. त्यांच्या म्हणण्यानुसार पुढील युद्धे पाण्यासाठीच होतील. या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला युद्धपातळीवर काही पावले उचलावी लागतील. शहरांमधील ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषेवरील सर्व बांधकामे तात्काळ पाडावी लागतील. 'स्पंज सिटी' ही संकल्पना राबवून शहरांमध्ये पाणी शोषून घेणारी उद्याने आणि खुली मैदाने राखली पाहिजेत. रस्ते बांधताना आणि गल्लीबोळात पेविंग ब्लॉक बसवताना पाण्याचा निचरा होण्यासाठी मातीचा भाग सोडणे कायद्याने बंधनकारक केले पाहिजे. घाटमाथ्यावरील आणि संवेदनशील डोंगराळ भागांमधील उत्खनन आणि बेकायदेशीर बांधकामांवर संपूर्ण बंदी घालण्याची वेळ आली आहे. माधव गाडगीळ समितीच्या अहवालाकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महामार्ग आणि लोहमार्ग बांधताना पाणी वाहून जाण्याच्या नैसर्गिक मार्गांना धक्का लागणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. या काही बाबींकडे लक्ष दिले गेल्यास उत्तम, अन्यथा येत्या काळात अनर्थ टाळता येणार नाही.

**चर्चा आजची**

# भक्ती, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचा संगम

**प्रमोद जाधव**

आषाढी एकादशी निमित्त रायगड जिल्ह्यातील शाळांमध्ये वारकरी दिंडी काढण्यात आली. वेगवेगळ्या सामाजिक संस्था, संघटनांनी पुढाकार घेत एक दिवस तरी वारी अनुभवावी या संकल्पनेतून अलिबागमध्ये वारी काढली. या सोहळ्यातून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा संदेशही पोहचविण्याचा प्रयत्न वृक्षारोपणातून देखील करण्यात आला. ताल-मृदंग हाती घेऊन ज्ञानोबा-तुकारामआणि विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलचा अखंडनाम घोषाने संपूर्ण जिल्हा दुमदुमून गेला. मोबाईल, संगणकीय जगतामध्ये जगणारी पिढीने देखील या सोहळ्याचा आनंद लुटला. भक्ती, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला.



आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त उज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवस तरी वारी अनुभवावी हा नाविन्य उपक्रम अलिबागमध्ये आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून अलिबागकरांनी वारीचा आनंद अनुभवला. भक्तीमय वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या पायी दिंडीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. अलिबागमधील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथून सुरु झालेल्या या रॅलीची सांगता वरसोली येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे गुरुवारी (दि.२३) सकाळी झाली. या वारीमध्ये रामनाथ मराठी शाळेतील सुमारे ४० ते ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाळ-मृदंगाच्या गजरात,ज्ञानोबा-तुकारामआणि विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल च्या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन गेला होता. यावेळी लायन्स क्लबचे पदाधिकारी, विविध बचत गटांतील महिला, नागरिक, उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे कर्मचारी व अनेक वारकरी भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या उपक्रमाला धर्मादाय आयुक्त राजेश इंगोले, डॉ. कोकणे, जागृती फाउंडेशनच्या जागृती बेलेकर, लायन्स क्लबचे प्रतिनिधी, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.वारीमध्ये सहभागी झालेल्या वारकरी भक्तांसाठी जागृती फाउंडेशनच्या जागृती बेलेकर यांच्या वतीने आवश्यक साहित्यांसह पाणी व चहा नास्त्याची व्यवस्था करण्यात आली. अनेक भक्तांना कुर्ते व सदरे वाटप करून सेवाभावाचा आदर्श घालून देण्यात आला.या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला चंदनशिव-चव्हाण, माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, उपाध्यक्ष महेंद्र पाटील व खजिनदार डॉ. नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. विशेष म्हणजे, उज्वला चंदनशिव यांनी स्वतः अलिबाग ते वरसोली पर्यंत पालखी खांद्यावर घेत संपूर्ण पालखी सोहळा चालत पूर्ण केला. विठ्ठलभक्तीचा हा अविस्मरणीय अनुभव त्यांच्या जीवनातील अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी क्षण ठरला. त्यांच्या या भक्तिभावाने उपस्थित वारकऱ्यांनाही प्रेरणा मिळाली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माथाडी कामगार संघटना, सर्व स्वयंसेवक, सामाजिक संस्था, मान्यवर, विद्यार्थी, महिला बचत गट, लायन्स क्लब, जागृती फाउंडेशन आणि सर्व वारकरी भक्तांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.एक दिवस तरी वारी अनुभवावी हा संदेश समाजापर्यंत पोहोचवत भक्ती, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला.

आषाढी एकादशी निमित्त रायगड जिल्ह्यामध्ये वारकरी संस्कृतीचे दर्शन घडले. जिल्हा परिषद शाळांसह वेगवेगळ्या खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांनी हातात टाळ मृदुंग, लेझीम घेऊन पारंपारिक वेशभुषा करून हरिनामाचा जप करण्यात आली.विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखूमाईसह इतर संताची केलेली वेशभुषा दिंडीचे आकर्षण ठरले. संपुर्ण जिल्हा विठ्ठलाच्या जयघोषाने दुमदूमला. जिल्ह्यामध्ये मंगलमय वातावरणात हा सोहळा पार पडला. दरम्यान पर्यावरणाचे महत्व पटवून देत असता, झाडे लावा झाडे जगवा हा संदेशही पोहचविण्याचा प्रयत्न या वारीच्या माध्यमातून करण्यात आला.

आषाढी एकादशीला पंढरपूरची वारी आणि चातुर्मासाची सुरुवात म्हणून ओळखली जाते. वारकरी संप्रदायातील अत्यंत पवित्र दिवस म्हणून ओळखला जातो. आषाढ महिन्यातील शुल्क पक्षाच्या एकादशीला येणार आध्यात्मिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्वाचा दिस म्हणून मानला जातो. यंदा आषाढी एकादशी शनिवारी(दि.२५) रायगड जिल्ह्यामध्ये साजरी करण्यात आली. वेगवेगळे धार्मिक उपक्रमांतून हा उत्सव साजरा करण्यात आला. आषाढी एकादशीनिमित्त वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्या वतीने दिंडीचे आयोजन करण्यात आले. आषाढी एकादशीचे महत्व पटवून देण्यात आले. जिल्ह्यातील विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात जाऊन दर्शन घेण्यात आले. यावेळी मंदिरात अलोट गर्दी दिसून आली. आषाढी एकादशीनिमित्त रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांसह खासगी शाळांमध्ये गावागावात व शाळेच्या परिसरात वारकरी दिंडी काढण्यात आली. काही शाळकरी मुलांनी विठ्ठल रखुमाई तर काहींनी वेगवेगळ्या संताची वेशभुषा करून हरिनामाचा जप करण्यात आला. टाळ मृदूंगाच्या आवाजाने संपुर्ण जिल्हा भक्तीमय वातावरणात रमून गेल्याचे चित्र पहावयास मिळाले. शाळकरी मुलांनी या सोहळ्याचा आनंद मनमुरादपणे लुटला. यावेळी पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. झाडांचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**लोकसंसद**

### महाबळेश्वरमध्ये ब्लॅक पँथरचे दर्शन!

सध्या प्रसारमाध्यमात आणि समाजमाध्यमात महाबळेश्वर आणि पाचगणी यांच्या दरम्यान 'पुस्तकांचे गाव' म्हणून ओळख असलेल्या भिलार गावात एक दुर्मिळ वन्यजीव असलेला 'ब्लॅक पँथर' दिसल्याचे छायाचित्र वेगाने प्रसारित झाले असून हा ब्लॅक पँथर रात्रीच्या वेळी घरांच्या आणि व्हरांड्यांच्या आसपास फिरताना तसेच परिसरातील पाळीव प्राणी व जनावरांची शिकार करताना आढळला असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. ब्लॅक पँथरच्या दर्शनाने या परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि चिंतामिश्रित कुतूहल निर्माण झाले आहे. वास्तविक ब्लॅक पँथर हा मुळात बिबट्याच असून मेलॅनिन या रंगद्रव्याच्या अतिरिक्त प्रमाणामुळे त्याचा रंग पूर्ण काळा होतो. त्यामुळे त्याला काळ्या बिबट्या असेही म्हटले जाते. या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी जंगलात फिरताना तसेच शेतीची कामे करीत असताना ब्लॅक पँथर दिसल्यास स्वतःची काळजी घ्यावीच, परंतु त्याला कोणतीही इजा न पोहोचवता वनविभाग आणि प्रशासनाच्या साहाय्याने सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात परत पाठवण्यासाठी पावले उचलावीत. कारण जागतिक स्तरावर या ब्लॅक पँथरची संख्या केवळ ११ टक्के इतकी आहे आणि वन्यजीवांचे रक्षण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.



**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# जागतिक निसर्ग संवर्धन दिन

दरवर्षी २८ जुलै रोजी जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा केला जातो. जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश पृथ्वीवरील नैसर्गिक वातावरणातून नामशेष होण्याच्या मार्गावर असलेले प्राणी आणि झाडे वाचवणे हा आहे. यादिवशी जगभरात विविध कार्यक्रम आणि चर्चासत्रे आयोजित केले जातात.

निसर्ग संवर्धन म्हणजे काय? तर निसर्गातील सर्व संसाधनांचा मुबलक प्रमाणात वापर करणे आणि शाश्वत, पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करणे होय. निसर्ग संसाधने म्हणजेच हवा, पाणी, खनिजे आणि माती यांचा काटेकोर पध्दतीने अवलंब करणे. जेणेकरून आपण आपल्याकडील वारसा हा पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवणे. याच उद्देशाने जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा केला जातो.

निसर्गाचे जतन करणे आणि संवधन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हवामानात बदल होताना दिसत आहे. त्यामुळे गंभीर समस्या निर्माण होत आहेत. जागतिक तापमान वाढ, वाढते प्रदूषण आणि इतर कारणामुळे नैसर्गिक समतोल बिघडत आहे. त्यामुळे निसर्गाचे संरक्षण करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. यामुळे पृथ्वीवर होणाऱ्या दुष्परिणाम कमी होण्यास मदत होईल.

हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास, जंगलतोड, प्रदूषण आणि अधिवासाचा नाश यांसारख्या वाढत्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर या समस्या केवळ वन्यजीव आणि परिसंस्थांनाच नव्हे, तर मानवी आरोग्य, अर्थव्यवस्था आणि जीवनाच्या एकूण गुणवत्तेलाही धोका निर्माण करतात. जबाबदार उपभोग, शाश्वत विकास आणि जैवविविधतेचे जतन यांना प्रोत्साहन देऊन हे धोके कमी करणे, हे संवर्धन प्रयत्नांचे उद्दिष्ट आहे. नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करून आणि आपला पर्यावरणीय ठसा कमी करून आपण मानव आणि पर्यावरण यांच्यात अधिक लवचिक आणि सुसंवादी संबंध निर्माण करू शकतो.

जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा करत असताना, हे ओळखणे महत्त्वाचे आहे की, आपल्या आजच्या कृती उद्याच्या जगाला आकार देतात. संवर्धन आणि शाश्वततेला प्राधान्य देऊन, आपण भावी पिढ्यांना आनंद घेण्यासाठी एक अधिक निरोगी ग्रह निर्माण करू शकतो. प्रत्येक योगदान, मग ते कितीही लहान असो, पृथ्वीचा नैसर्गिक वारसा जतन करण्याच्या आणि सर्वांसाठी एक शाश्वत भविष्य सुनिश्चित करण्याच्या सामूहिक प्रयत्नांमध्ये हातभार लावते.

जसे की, निसर्ग आणि शेती शेतीही निसर्गावर आधारित आहे. परंतु, गेल्या काही वर्षात पारंपरिक पध्दतीने शेती केली जात नाही. जमिनीत अमर्याद स्वरूपात रासायनिक खतांचा वापर वाढता आहे. त्यामुळे जमिनीचा ऱ्हास होताना दिसतो. त्यामुळे आता वेळी अली आहे की, एकत्र येऊन नैसर्गिक शेतीकडे वाळून शेणखत आणि इतर नैसर्गिक खतांचा वापर करून चांगले उत्पादन घेऊन निसर्गाशी मैत्री करावी.

चला, आपण सर्व मिळून आपल्या ग्रहाच्या मौल्यवान संसाधनांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी वचनबद्ध होऊया. निसर्गाच्या अंगभूत मूल्याचा आदर करणारी आणि मानव व नैसर्गिक जग यांच्यात सुसंवादी सहअस्तित्व वाढवणारी संवर्धनाची संस्कृती आपण अंगीकारूया.

जसे की, जास्तीत जास्त झाडे लावून त्यांचे संगोपन करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि जलबचत करणे, प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे टाळणे, वीज व ऊर्जेची बचत करणे आदी. तरच आपण वारसा हा नैसर्गिक संसाधनांचा वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेऊ शकतो.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२८ जुलै
१) श्री. अनंत वसंत नेने
अलिबाग, २८-७-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**श्री. शरद चिंतामण देशपांडे, लग्नदिना निमित्त, अलिबाग**

**कै. दत्तू सहदेव पाटील, पुण्यस्मरण, चौलमळा, अलिबाग**

**कै. सुधा व्यंकटेश दामले, स्मरणार्थ अलिबाग**

# संतप्त पालकांकडून शाळेला टाळे

## •शिक्षकांच्या कमतरतेबरोबरच शाळेच्या इमारतीचीही दुरवस्था

**| वसई | प्रतिनिधी |**

वसई तालुक्यातील मांडवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला संतप्त पालक आणि ग्रामस्थांनी टाळे ठोकून जोरदार आंदोलन केले आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील कोलमडलेल्या शिक्षण व्यवस्थेच्या विरोधात हा संताप व्यक्त करण्यात आला आहे.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील शिक्षण व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे धक्कादायक चित्र वसई तालुक्यातील मांडवी येथून समोर आले आहे. पहिली ते चौथीपर्यंतच्या ३० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी तब्बल दीड वर्षांपासून केवळ एकच शिक्षक कार्यरत असून दुसरा मंजूर शिक्षक गैरहजर आहे. त्यातच शाळेची इमारत मोडकळीस आल्याने संतप्त पालक आणि ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला टाळे ठोकत जोरदार आंदोलन केले.



मांडवी येथील या शाळेतील सर्व विद्यार्थी आदिवासी समाजातील असून पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग भरवले जातात. या शाळेत पहिली ते चौथीपर्यंतचे तीस विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नियमानुसार दोन शिक्षकांची आवश्यकता असताना तब्बल दीड वर्षांपासून एकाच शिक्षकावर चार वर्गांचा भार पडला आहे. त्यातही उपलब्ध शिक्षकांना निवडणूक व अन्य प्रशासकीय कामांमध्ये गुंतवले जात असल्याने नियमित अध्यापन होत नाही, असा आरोप पालकांनी केला आहे. परिणामी विद्यार्थी शाळेत येतात, मध्यान्ह भोजन करून परत जातात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शिक्षकांच्या कमतरतेबरोबरच शाळेच्या इमारतीचीही दुरवस्था झाली आहे. वर्गखोल्यांच्या स्लॅबचे प्लास्टर कोसळत असून जीव धोक्यात घालून विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत असल्याची तक्रार पालकांनी केली आहे.

### शिक्षणाधिकाऱ्यांच्या दालनातच शाळा भरवण्याचा इशारा

याप्रकरणी प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी दुसरा शिक्षक उपलब्ध करून शाळेची दुरुस्ती करावी, अन्यथा विद्यार्थ्यांना घेऊन शिक्षणाधिकाऱ्यांच्या दालनातच शाळा भरवण्यात येईल, असा इशारा पालकांनी दिला आहे. दरम्यान, शाळेला टाळे ठोकल्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरच बसावे लागले असून, या आंदोलनामुळे ग्रामीण शिक्षण व्यवस्थेतील गंभीर वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.

याबाबत गटविकास अधिकारी, केंद्रप्रमुख आणि शिक्षण विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप स्थानिक प्रतिनिधींनी केला आहे.

# आक्कादेवी धरणावर अवतरली तरुणाई

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील निसर्गरम्य परिसरातील आक्कादेवीच्या धरणावर रविवारी (दि.२६) सुट्टीनिमित्त धबधब्याचा आनंद घेण्यासाठी उरण तालुक्यासह नवीमुंबईतील तरुणाई पर्यटकांनी सकाळपासून गर्दी केली होती.

यंदा पावसाळ्यातील जून महिना एकदम कोरडा गेल्याने बळी राजाचे शेतातील भात पेरणीला २५ दिवसाहून अधिक उशीर झाल्याने लावणीच्या हंगामाला दिरंगाई होत आहे. जुलै महिन्याच्या प्रारंभी पावसाला खरी सुरुवात झाल्याने धरण, नद्या, नाल्यांमध्ये पाणी साचायला उशीर झाला होता. मात्र कधी नव्हे ते यंदा जुलैच्या



पहिल्या आठवड्यातच डोंगराचे पाणी पाझरून उरण तालुक्यातील रानसई, पुनाडे व चिरनेर आक्कादेवी ही तिनही धरणे पावसाच्या पाण्याने भरून ओसांडून वाहू लागली आहेत.

चिरनेर येथील आक्कादेवी धरण परिसर उत्तर, पूर्व व दक्षिण या तिन्ही दिशांना डोंगरमाथा हिरवेगार निसर्गरम्य परिसर आणि तिन्ही डोंगरातील पावसाचे पाणी या धरणातून ओसांडून वाहत आहे. हे पाणी झेलण्याचा आनंद घेण्यासाठी अनेक ठिकाणची तरुणाई मोठ्या संख्येने या धरणाच्या ठिकाणी आकर्षित होताना दिसत आहे. तर सध्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्वच मोठमोठ्या पर्यटनस्थळी बंदी करण्यात आली आहे. त्यामुळे चिरनेर येथील या उरण व नवीमुंबई परिसरातील पर्यटकांना अवघ्या काही अंतरावर असलेल्या धरणावरून ओसांडणाऱ्या पाण्याची मजा अधिक ओर आहे.

याशिवाय येथील चिरनेर ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जात नसून धरणाची उंची अधिक उंच नसल्याने पर्यटकांना विशेषतः धोका नसल्याने या आक्कादेवी धरण परिसरात पावसाळ्यात धबधब्याची मजा लुटण्यासाठी पर्यटक आकर्षित होत आहेत.

### मांडला शाळेत रेनकोट वाटप

**कोर्लई :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडला संकुलातील सर्व विद्यार्थ्यांना पावसाळ्यात सुरक्षितपणे शाळेत ये-जा करता यावी, या सामाजिक भावनेतून मांडला रोहिदासवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते दिलीप लक्ष्मण रोहेकर, त्यांच्या पत्नी निकिता रोहेकर आणि चिरंजीव संस्कृत रोहेकर यांच्याकडून सर्व विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत रा.जि.प. मांडला प्राथमिक शाळा संकुलात मराठी माध्यम अंगणवाडी, उर्दू माध्यम अंगणवाडी, प्राथमिक शाळा उर्दू व मराठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले.

पान १ वरून

## भ्रष्ट अधिकाऱ्यासाठी महसूल यंत्रणा बंद?

समर्थनासाठी तलाठी संघाने कामबंद आंदोलन छेडले असून, २७ जुलैपासून बेमुदत संपाचा इशाराही दिला आहे. मात्र, कायद्याच्या चौकटीत झालेल्या कारवाईविरोधात सरकारी कर्मचारीच रस्त्यावर उतरत असतील, तर कायद्याचा धाक उरणार कसा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यावर यापूर्वीही लाचखोरी आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले असल्याची चर्चा असताना, अशा अधिकाऱ्याच्या बचावासाठी संपूर्ण महसूल यंत्रणा कामबंद करत असेल, तर तो भ्रष्टाचाराला उघड पाठिंबा असल्याचे चित्र निर्माण होत आहे.

या आंदोलनाचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सातबारा, फेरफार, वारस नोंदी, जात, उत्पन्न, निवासी दाखले यांसारख्या अत्यावश्यक सेवांसाठी शेतकरी, विद्यार्थी, बेरोजगार आणि नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. एका अधिकाऱ्याच्या समर्थनासाठी लाखो नागरिकांना वेठीस धरण्याचा अधिकार तलाठी संघाला कोणी दिला? असा संतप्त प्रश्न जनतेतून विचारला जात आहे.

कायद्याने गुन्हा दाखल केला, पोलीस तपास करत आहेत आणि न्यायालय निर्णय देणार आहे. अशा वेळी आंदोलनाच्या माध्यमातून तपास यंत्रणांवर दबाव आणण्याचा प्रयत्न हा लोकशाही व्यवस्थेला न शोभणारा असल्याची टीका सर्व स्तरातून होत आहे. दोषी अथवा निर्दोष हे न्यायालय ठरवेल; परंतु त्याआधीच संघटनांनी संरक्षण कवच बनणे, ही चिंताजनक बाब असल्याचे मत व्यक्त होत आहे.जनतेने जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाला आवाहन केले आहे की, कोणत्याही संघटनात्मक दबावाला बळी न पडता प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी. तसेच, जनतेला वेठीस धरणारे कामबंद आंदोलन तातडीने संपुष्टात आणून महसूल विभागाच्या अत्यावश्यक सेवा सुरळीत सुरू ठेवाव्यात. भ्रष्टाचाराविरोधात भूमिका घेतली नाही, तर उद्या प्रत्येक कारवाईनंतर सरकारी यंत्रणाच संपावर जाईल आणि त्याची किंमत मोजावी फक्त सामान्य जनतेलाच भोगावी लागेल.

**निष्पक्ष चौकशीची मागणी**

जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाने कोणत्याही प्रकारच्या दबावाला बळी न पडता प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, तसेच म हसूल विभागाचे कामकाज सुरळीत सुरू ठेवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी जनतेतून होत आहे. सरकारी यंत्रणा ही जनतेच्या सेवेसाठी आहे; एखाद्या अधिकाऱ्याच्या वैयक्तिक प्रकरणासाठी सामान्य नागरिकांना वेठीस धरणे कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरणार नाही, अशी ठाम भावना व्यक्त केली जात आहे.

**दोघांचा अटक पुर्व जामीन अर्ज दाखल**

विस्तारित शहापूर औद्योगिक जमीन संपादनात मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यातआला आहे. या गुन्ह्यातील आरोपी तलाठी सतिश ढवळे आणि रिना पाटील यांनी अटक पुर्व जामीनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. न्यायालयाच्या सुनावणीनंतर पुढील कारवाई होणार आहे.

तक्रारीनुसार संबंधितांची चौकशी करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. न्यायालयानेदेखील ही कारवाई अधिकृत असल्याचे सांगत रविदास जाधव यांच्याविरोधात पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे बेकायदेशीररित्या अटक केल्याचा आरोप खोटा आहे.

**– रिजवाना नदाफ, पोलीस निरीक्षक, पोयनाड पोलीस ठाणे**

## शेकापच्या मेळाव्यात सामील व्हा

अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, अलिबाग नगरपरिषदेचे गटनेते प्रशांत नाईक, राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, सार्वजनिक वाचनालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, सहचिटणीस नरेश म्हात्रे, माजी तालुका चिटणीस अनिल पाटील, शेतकरी आघाडीचे तालुका प्रमुख अनिल गोमा पाटील, नगरसेवक अनिल चोपडा, सुरेश खोत, निलेश खोत, वृषाली ठोसर, अजय झुंजारराव, ॲड. सचिन जोशी, ॲड. विजय पेढवी, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी आदींसह पदाधिकारी व वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त रायगड जिल्ह्यात तालुका स्तरावर बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. हा वर्धापन दिन कार्यकर्त्यांसाठी प्रेरणा देणारा व एक वेगळा उत्साह निर्माण करणारा ठरणार आहे. त्यामुळे हा दिवस सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. अलिबाग तालुक्यातील ग्रामीण भागातून गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी वर्धापन दिन सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

**शेकापची ताकद दाखविण्याची हीच वेळ : सुरेश खैरे**

खालापूरमधील महामार्गालगत भव्य अशा मैदानात शेकापचा वर्धापन दिन होणार आहे. त्यानिमित्ताने पोलादपूरपासून वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये बैठका घेण्यात आल्या. या बैठकांच्यादरम्यान कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतकरी कामगार पक्षाने अनेक चढ-उतार पाहिले. सत्तेची लालसा कधीही घेतली नाही. भूमीपुत्र, शेतकरी, कष्टकरी, कामगारांचा आवाज बनण्याचे काम पक्षाने केले. शेतकरी कामगार पक्षाने केलेल्या आंदोलनामुळे जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, वंचित घटक ताठ मानेने उभा आहे. स्मार्ट मीटरच्याविरोधातही शेतकरी कामगार पक्षाने पहिली आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर दिल्ली येथील विद्यार्थ्यांवर लाठीहल्ल्याप्रकरणी शेतकरी कामगार पक्षाने आक्रमक भूमिका घेत आंदोलन अलिबागमध्ये केले आहे. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा लढा पुकारला होता. शेकापची ताकद दाखविण्याची हीच वेळ आहे. हेच संघटन, हीच आक्रमकता जिवंत ठेवून मोठ्या ताकदीने वर्धापन दिन सोहळ्यात सहभागी व्हा, असे शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केले.

**हजारो कार्यकर्ते सहभागी होणार : सुरेश घरत**

शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन म्हणजे सर्व कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारा दिवस आहे. या मेळाव्यातून विचारांचे एक वेगळे बळ घेऊन पुन्हा कार्यकर्त्यांना कामाला लागायचे आहे. वर्धापन दिनाला जाण्यासाठी अलिबाग तालुक्यातून तयारी झाली आहे. अलिबाग नगरपरिषदेचे गटनेते प्रशांत नाईक यांनी मोलाचे योगदान दिले आहे. या सोहळ्यामध्ये पाच हजार कार्यकर्ते सहभागी होतील, असा विश्वास तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी व्यक्त केला.

**खालापूरच्या मेळाव्यात सामील व्हा : प्रदीप नाईक**

शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त पोलादपूरपासून कर्जत, मुरूडपर्यंत बैठका घेण्यात आल्या आहेत. या बैठकांमधून शेकापच्या नेत्या सुप्रिया पाटील, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्याकडून मोलाचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना मिळाले आहे. दिल्लीतील जंतरमंतरमधील विद्यार्थ्यांना शेकापने पाठिंबा दिला. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील या स्वतः दिल्लीला गेल्या. तेथील विद्यार्थ्यांना भेटल्या. अखेर विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश आले. त्यामुळे हा विजय सर्व कार्यकर्त्यांना स्फूर्ती देणारा आहे. कोणतेही पाठबळ नसताना, इच्छाशक्तीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी विजय मिळविला आहे. या आंदोलनातून प्रेरणा घेऊन प्रत्येक कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहायचे आहे. पक्षाला अधिक बळकट करण्याबरोबच कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी हा मेळावा महत्त्वाचा असणार आहे, असे शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक यांनी सांगितले.

## खारभूमी कार्यालयात वाढदिवसाचा जल्लोष

इतर अधिकारी व कर्मचारी कुठे आहेत, याबाबत स्पष्ट माहिती देण्यास कोणीही तयार नव्हते. विशेष म्हणजे, हालचाल नोंदवही (मुव्हमेंट रजिस्टर) आणि हजेरी पुस्तकाची मागणी करूनही ती तात्काळ उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतच गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

कार्यालय एकांत ठिकाणी असल्याचा फायदा घेत कर्मचारी मनमानी पद्धतीने कामकाज करीत असल्याची चर्चा परिसरात आहे. एकीकडे नागरिकांची विविध कामे प्रलंबित असताना, दुसरीकडे कार्यालयीन वेळेत वाढदिवसाच्या तयारीला प्राधान्य दिले जात असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

शासकीय कार्यालयात नागरिकांची कामे सर्वाधिक प्राधान्याने होणे अपेक्षित असताना अधिकारी-कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, हजेरी व हालचाल नोंदवही देण्यास टाळाटाळ आणि कार्यालयीन वेळेत वाढदिवसाचा जल्लोष हा प्रकार प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.

या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

कार्यकारी अभियंता ‘नॉट रिचेबल’?

या प्रकाराबाबत कार्यकारी अभियंता प्रशांत मयेकर यांच्याशी अनेकदा भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर कनिष्ठ अभियंता हंबीर यांनी मयेकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. त्यानंतर मयेकर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला; मात्र कार्यालयातील अनियमिततेबाबत त्यांनी दिलेली उत्तरे समाधानकारक नसल्याचे दिसून आले.

## ई-टॉयलेट बनले मृत्यूचे सापळे

माथेरानमध्ये प्रशासकीय काळात नगरपरिषदेने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाजारभावापेक्षा जास्त ३८ लाख ७० हजार रुपयाला ई-टायलेट खरेदी केले. त्यामुळे या प्रकियेत मोठ्या प्रमाणात भष्टाचार झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यातच काही दिवसांपूर्वी माथेरानमधील एको पॉईट येथील ई-टॉयलेटमध्ये एक महिला पर्यटक अडकल्याची घटना घडली होती. ही महिला ई-टॉयलेटच्या आतमध्ये गेली असता, आतील दरवाजाची कडी उघडण्याच्या प्रयत्नात कडीचे हॅन्डल तुटले. त्यानंतर आत अडकलेल्या महिलेने याबाबत ओरडून बाहेर उभ्या असलेल्या तिच्या पतीला सांगितले. त्यानंतर त्यांनी ईको पॉईंट येथील व्यावसायिक रेखा पाटील व भरत कांरडे यांच्या मदतीने ई-टॉयलेटच्या बाहेरच्या दरवाजाचे हॅन्डल तोडून महिलेची सुखरूप सुटका केली. आणखी थोडा वेळ झाला असता, तर मोठा अनर्थ झाला असता. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी खर्चून खरेदी केलेले निकृष्ट दर्जाचे ई-टॉयलेट पर्यटकांच्या जीवावर बेतत आहे. याबाबत पर्यटकांसह स्थानिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## आमदारांच्या गावातच कोट्यवधींची तस्करी

दरम्यान, उल्टी बाळगणे, वाहतूक करणे व त्याची विक्री करणे असा ठपका ठेवत त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलिबाग पोलिसांनी राहुल हातणी याच्यासह चार कोटी रुपये किमतीची चार किलो वजनाची व्हेलची उलटी व २५ हजार रुपयांची दुचाकी असा एकूण ४ कोटी २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## घोड्यांच्या लिदीला ‘ई-टेम्पो’चा पर्याय!

माथेरानमधील घोड्यांच्या लिदीमुळे प्रदूषण वाढत असून, पर्यावरणाला धोका निर्माण होत असल्याचा दावा करत सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे आणि केतन रामाणे यांनी पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादात याचिका दाखल केली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ, लोणेरे-माणगाव यांच्या माध्यमातून पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर घोड्यांच्या लिदीचा शास्त्रोक्त अभ्यास केला. या पाहणीत माथेरानचे पाणी, हवा आणि माती प्रदूषित असल्याचे निष्पन्न झाल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. घोड्यांची संख्या कमी करणे, तबेले माथेरानच्या पर्यावरण क्षेत्राबाहेर हलविणे, घोड्यांसाठी मार्ग निश्चित करणे तसेच लिदीवर प्रक्रिया करण्याबाबत ठोस उपाययोजना करण्याचे आदेश हरित लवादाने दिले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सादर केलेल्या ५४ पानी प्रतिज्ञापत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठातील माथेरानच्या पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करणारे प्राध्यापक हे तज्ज्ञ असल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी दि. १५ सप्टेंबर रोजी होणार आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. वर्निका बजाज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे ॲड. मानसी जोशी, तर माथेरान नगरपरिषदेच्यावतीने ॲड. प्रिया गोंधळेकर यांनी बाजू मांडली.

पालिकेच्या प्रतिज्ञापत्रावर लवादाची नाराजी

याचिकेवरील गुरुवारी झालेल्या सुनावणीत न्यायाधीश दिनेशकुमार सिंग यांनी माथेरान नगरपरिषदेने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावर नाराजी व्यक्त केली. लवादाने दि. ९ जूनच्या आदेशात घोड्यांची संख्या कमी करणे, तबेले स्थलांतरित करणे, घोड्यांचे मार्ग निश्चित करणे आणि लिदीवर प्रक्रिया करण्याबाबत पालिका कोणती कार्यवाही करणार, याची सविस्तर माहिती मागितली होती. मात्र, नगरपरिषदेने केवळ ई-टेम्पोची मागणी केल्याचे निदर्शनास आले. घोड्यांच्या माध्यमातून होणारी मालवाहतूक आणि लिद वाहून नेण्यासाठी ई-टेम्पो हा पर्याय उपयुक्त ठरू शकतो. त्यातून घोड्यांची संख्या कमी होण्यासही मदत होऊ शकते. मात्र, लवादाने पालिकेला याबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र नव्याने सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# निवडक



## ग्रामपंचायतीचे विभागस्तरीय मूल्यमापन

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन तालुक्यातील रानवली ग्रामपंचायतीची विभागस्तरीय मूल्यमापन प्रक्रिया नुकतीच उत्साहात पार पडली. कोकण विभागातील या ग्रामपंचायतीची तपासणी विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथील उच्चस्तरीय समितीमार्फत करण्यात आली. या मूल्यमापन प्रक्रियेदरम्यान तपासणी समितीने अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व आठ मुख्य घटकांची व कामांची अतिशय सविस्तर पाहणी केली. ग्रामपंचायतीचे दप्तर, विकासकामे, स्वच्छता, प्रशासकीय कामकाज आणि विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी या सर्वांचा कसून आढावा समितीकडून घेण्यात आला. या तपासणीसाठी अमरावती विभागातून विशेष समिती दाखल झाली होती. यामध्ये शालिनी कडू (अप्पर आयुक्त, अमरावती विभाग), राजीव फडके (सहाय्यक आयुक्त), किशोर पांडे (विस्तार अधिकारी), ताडे (विस्तार अधिकारी) या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन तसेच ग्रामपंचायत कार्यालयात सर्व घटकांची सखोल तपासणी केली. याप्रसंगी प्रशासनाकडून रायगड जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे आणि श्रीवर्धनचे गटविकास अधिकारी राजू किरवे यांच्यासह तालुक्यातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



## कर्जतमध्ये रक्तदान शिबीर उत्साहात

**कर्जत :** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कपालेश्वर देवस्थान समिती आणि शिवतांडव प्रतिष्ठान ढोल-ताशा ध्वज पथक, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कर्जत-खालापूर तालुक्यातील सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे ५४३ वे रक्तदान शिबीर ठरले. कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात हे शिबीर पार पडले. राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. माजी नगरसेवक निलेश हरिश्चंद्रे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. ॲड. योगेश देशमुख यांनी आपल्या जीवनातले ५२ वे रक्तदान केले. याप्रसंगी माजी नगरसेवक भालचंद्र जोशी, आशिष गोखले, संदीप भोईर, विवेक भागवत, ॲड.अभिजीत मराठे, निलेश परदेशी, सदानंद जोशी, मंदार लेले, रोनक कोठारी, रघुनाथ खैरे, बंटी लोवंशी, सर्वेश गोगटे, नमित दांडेकर, नारायण भोईर, रोहित कानडे, रितेश जाधव, निहार व्यापारी आदी उपस्थित होते.



## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**श्रीवर्धन :** रायगड जिल्हा परिषद शाळा कांदळवाडा येथे आषाढी एकादशीचे औचित्य साधून स्व. अरुण यशवंत पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ज्योती पाटील, रिद्धी पाटील व विचारे दाम्पत्याच्या वतीने महत्त्वपूर्ण शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. माधुरी गजानन विचारे यांच्या संपर्कातून शाळेला प्रिंटर, ४३ इंची स्मार्ट टीव्ही तसेच विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य, चित्रकला वह्या आणि खाऊ देण्यात आला. दरवर्षी शैक्षणिक मदत करणाऱ्या ज्योती पाटील यांचा हा निरपेक्ष सेवाभाव कौतुकास्पद असून, विद्यार्थ्यांनी उत्तम प्रगती केल्यास पुढेही मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत काढलेली वारी-दिंडी सर्वांचे आकर्षण ठरली. कार्यक्रमास केंद्रप्रमुख धर्मा धामणकर, अध्यक्ष जयराम मोहिते, सरपंच पांडुरंग बने, गाव अध्यक्ष पाखड आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. अरुण पाटील यांना शैक्षणिक कार्यातून दिलेली ही आदरांजली विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ज्ञानाची बीजे रोवणारी ठरली आहे.



## रोहा लायन्स क्लबचा पदग्रहण सोहळा

**कोलाड :** रोहा लायन्स क्लबचा ५३ वा पदग्रहण सोहळा रोहा येथील अक्षय लॉन निवी येथे उत्साही वातावरणात पार पडला. रोहा लायन्स क्लब रोहाच्या अध्यक्षपदी ॲड. मिलन शहा, तर सेक्रेटरीपदी संजय एकल, खजिनदार माया शहा, उपाध्यक्ष जयदेव पवार यांची निवड करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर जिल्हा प्रांतपाल पीएमजेएफ प्रवीण सरनाईक, जिल्हा सेक्रेटरी नयन कवळे, रिजन चेअर पर्सन विद्या अधिकारी, झोन चेअर पर्सन मंजुषा कुद्रीमोती, माजी अध्यक्ष लक्ष्मण शिट्यालकर, नवे अध्यक्ष मिलन शहासह मान्यवर तसेच रोहा लायन्स क्लबचे ज्येष्ठ श्रेष्ठ सर्व लायन सदस्य व लायन महिला सदस्या बहुसंख्येने उपस्थित होते. मावळते अध्यक्ष लक्ष्मण शिट्यालकर यांनी वर्षभरात केलेल्या सामाजिक कामांचा आढावा तसेच क्लबने विविध स्तरावर राबविलेले उपक्रम उपस्थितांसमोर मांडला. तसेच वर्षभर कार्यक्रम राबवण्यासाठी सहकार्य करणाऱ्या लायन्स सदस्यांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तर वर्षभर उपक्रम राबवताना मदत करणाऱ्या सदस्यांचे आभार मानले.

## निवडक



### अरुण पवार यांचा वाढदिवस साजरा

**माणगाव :** माणगाव येथील लोकनेते अशोकदादा साबळे पतसंस्था माणगावचे चेअरमन व सुधाकर शिपूरकर तसेच गणेश वाघरे इंग्लिश मिडीयम स्कूल माणगावचे स्कूल कमिटीचे चेअरमन अरुण तुकाराम पवार यांचा ६१ वा वाढदिवस त्यांच्या सिद्धीनगर माणगाव येथील निवासस्थानी सोमवारी (दि.२७) जुलै रोजी कौटुंबिक वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. खा. सुनील तटकरे तसेच माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी दूरध्वनीवरून पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. पवार यांचे सामाजिक, शैक्षणिक, सहकार व क्रीडा क्षेत्रात विशेष नाव आहे. त्यांच्या वाढदिवसाला चाहत्यांचे, मित्रपरिवारांनी मध्यरात्रीपासून दूरध्वनी व व्हाट्सअपवरून शुभेच्छा संदेश देण्यात आल्या.



### अस्लम राऊत यांचा वाढदिवस उत्साहात

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील मोर्बा गावचे राजिप सदस्य अस्लम इब्राहिम राऊत यांचा वाढदिवस त्यांच्या मोर्बा येथील कार्यालयात सोमवारी (दि.२७) जुलै रोजी कौटुंबिक वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. राऊत यांना खा. सुनील तटकरे तसेच मंत्री आदिती तटकरे, विधान परिषदेचे आ. अनिकेत तटकरे यांनी दूरध्वनीवरून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच मोर्बा विभागातील, माणगाव तालुक्यातील व रायगड जिल्ह्यातील त्यांच्या असंख्य चाहत्यांनी, मित्रपरिवाराने, सगेसोयरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दूरध्वनीवरून, प्रत्यक्ष भेटून व व्हाट्सअपद्वारे राऊत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. राऊत हे संपूर्ण माणगाव तालुक्यासह जिल्ह्यात अस्लमभाई नावाने ओळखले जातात. वाढदिवसाच्या दिवशी सकाळपासून त्यांचे चाहते व मित्रपरिवार तसेच नातेवाईक, सगेसोयऱ्यांनी यांच्या मोर्बा येथील कार्यालयात त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आले होते.

### कळंबोलीत वृक्षदिंडीला प्रतिसाद



**पनवेल :** महाराष्ट्राच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त व संस्थेचे अध्यक्ष उत्तम शिंदे यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल वसुंधरा समृद्धी फाऊंडेशनच्या वतीने कळंबोली येथे पर्यावरण जनजागृतीसाठी वृक्ष दिंडी काढून गणेश विसर्जन तलाव परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मोठ्या उत्साहात वृक्षदिंडी काढण्यात आली. या कार्यक्रमास प्रमिला पाटील, रामदास शेवाळे, बायजा बारगजे, मोनिका महानवर, सरस्वती काथारा, रविनाथ पाटील, बबन बारगजे, तानाजी नारनवर, नितीन जाधव, लहू मलकमीर, सुनील रासकर, शशिकांत गोरे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

### नाईक-अंतुले महाविद्यालयात वृक्षारोपण

**म्हसळा :** म्हसळा येथील कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा येथे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंती समाहानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे विश्वस्त सचिव प्रतिनिधी फझल हळदे, महादेव पाटील, साजिद इनामदार, डॉ. मुस्ताक मुकादम, शाहीद उकये, शाहनवाज उकये, इस्माईल डोंडिलकर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. आर. एस. माशाळे, प्रा. हालोर राजेंद्र व प्रा. बढे मयूर यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● शुभमुहूर्त प्रथम पुनर्विवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८९३५७७५

● शुभमुहूर्त विवाहमंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरु. ४६ शाखा, वेबसाईट, ॲप्लीकेशन नावनोंदणीसाठी - ९२२६७६६१२९.

● जन्मकुंडली-हस्तरेखा-टॅरोकार्ड-अंकशास्त्र यावरुन ज्योतिषविषयक मार्गदर्शन व उपाय श्री म्हात्रे- ९२२६७६६१२९

● नोकरीची सुवर्णसंधी - दिशा पॅथॉलॉजी, अलिबाग येथे महिला / ज्येष्ठ नागरिक महिला यांच्यासाठी संधी. पद: रक्त नमुना (Blood Sample) संकलन कामाची वेळ: सकाळी ७:३० ते दुपारी १:०० प्रवास: पनवेल अलिबाग अप-डाउन अधिक माहितीसाठी संपर्क करा : ८५५२८५५२८८

● पाहिजेत - अनुभवी पिक-अप ड्रायवर/सोलार काम करणारे इलेक्ट्रीशन अनुभवी-आणि हेल्पर शिक्षणाची अट नाही. V.R.Enterprises Alibag 8888605259 / 8208140619 ( savitri perl Building Ram Mandir) (Bramhan Ali)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# अभिजात मराठी महाराष्ट्रात दुय्यम

## || खालापूर टोलनाक्याजवळ इतर भाषांचा फलक || महामंडळाने तातडीने दखल घेण्याची मागणी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

एकीकडे महाराष्ट्र शासन आणि मराठी भाषिक जनता मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात भाषेच्या दर्जामुळे गौरवान्वित होत असताना, दुसरीकडे याच शासनाच्या अखत्यारितील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मात्र, आपल्याच राज्यात मराठी भाषेची अवहेलना करत असल्याचे विदारक वास्तव दिसत आहे.





पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर, खालापूर टोल नाक्याच्या अलीकडे असलेल्या फूड मॉलच्या जवळ लावलेल्या माहिती फलकावरून मराठी भाषेला अक्षरशः नगण्य स्थान देण्यात आले आहे. पुणे ते मुंबई प्रवासादरम्यान खालापूर टोल नाक्याच्या अलीकडे असलेल्या या फूड मॉलमध्ये आणि तेथील परिसरातील इतर ठिकाणी दररोज हजारो मराठी भाषिक पर्यटक थांबतात. मात्र, तिथे एमएसआरडीसीने लावलेल्या माहिती फलकावर मराठीचा मोठा अभाव जाणवतो. धक्कादायक बाब म्हणजे, या फलकावर इंग्रजी आणि हिंदी भाषेसोबतच दक्षिण भारतीय भाषांपैकी तमिळ, कन्नड आणि तेलगू या भाषांचा समावेश करण्यात आला आहे.

या संपूर्ण फलकावर केवळ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि वाहन तळ हे दोनच शब्द मराठीत आढळतात, तर फलकावरील इतर सर्व महत्त्वाच्या सूचना केवळ इंग्रजी आणि हिंदी भाषेत आहेत. या प्रकाराबाबत स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, सरकारी यंत्रणाच जर आपल्या भाषेचा आदर करणार नसेल, तर इतरांकडून काय अपेक्षा ठेवणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित महामंडळाने तातडीने या फलकाची दखल घेऊन, हा फलक प्राधान्याने मराठी भाषेत असावा, त्यावरील सर्व सूचना मराठीत ठळकपणे प्रदर्शित कराव्यात आणि मराठीची होणारी ही अवहेलना त्वरित थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकरणावर एमएसआरडीसी प्रशासन आता काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या राज्यात मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, तिथे हा फलक प्राधान्याने मराठी भाषेत असणे अपेक्षित असताना, सरकारी महामंडळाकडून मराठीला अशा प्रकारे केवळ नगण्य स्थान देऊन इतर भाषांना झुकते माप दिले आहे.

> “महाराष्ट्र शासन प्रशासकीय स्तरावर मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्याचे आदेश वारंवार देत आहे. असे असतानाही सरकारी महामंडळाकडून मराठीला इतके नगण्य स्थान देणे, हा मराठी अस्मितेचा आणि अभिजात भाषेचा अपमान आहे. आम्ही महाराष्ट्रात आहोत की अन्य कोणत्या राज्यात? जर फलक महाराष्ट्रात आहे, तर त्यावर मराठी भाषेलाच सर्वोच्च प्राधान्य का नाही?”
> -संजय राऊत, ज्येष्ठ सनदी लेखापाल, अलिबाग

## सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात मनसेच्या रोजगार आणि स्वयंरोजगार विभागातर्फे गावपातळीवर सफाई कामगार म्हणून कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जिल्हा अध्यक्ष सतीश कालेकर यांच्या माध्यमातून तीन ग्रामपंचायतीमध्ये जाऊन रेनकोट वाटप करण्यात आले. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत कोल्हारे, दहिवली व पिंपळोली ग्रामपंचायत येथील सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मनसेचे कर्जत तालुका अध्यक्ष यशवंत भवारे, कर्जत तालुका महिला अध्यक्षा दर्शना कालेकर, कर्जत रोजगार आणि स्वयंरोजगार तालुका संघटक सागर काळण, उपतालुका संघटक जितेंद्र रुठे, विनोद शेंडे, अमोल कालेकर, पंकज बुंधाटे, किरण राणे, पोशिर उपशाखा अध्यक्ष हरिश्चंद्र राणे, किशोर कालेकर यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## खांदा कॉलनीत वर्षावास मालिकेचे आयोजन

**खांदा कॉलनी :** मुलगंधकुटी बुद्धविहार सामाजिक ट्रस्ट (रजि. ई-८०७), भारतीय बौद्ध महासभा गट क्र. ७ (खांदा कॉलनी, पनवेल), आरपीआय व महिला आघाडीच्या संयुक्त विद्यमाने वर्षावास मालिका २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. २२ जुलै ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. परिसरातील बौद्ध बांधवांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या वर्षावास मालिकेत विविध भिक्खु, धम्मप्रचारक व मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली धम्मदेशना, प्रवचने आणि विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## आशरीन शेख यांचा सत्कार



**| खोपोली | प्रतिनिधी |**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता विद्यालय व बी. एल. पाटील तंत्रनिकेतनच्या माजी विद्यार्थिनी आशरीन अशफाक शेख यांची बिहार लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेद्वारे सहाय्यक आयुक्त (राज्य विक्रीकर) पदावर निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्पर्धा परीक्षेत मिळविलेल्या या यशामुळे केटीएसपी मंडळाच्या शैक्षणिक परंपरेचा गौरव उंचावला असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर आणि कार्यवाह किशोर पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन शेख यांचा गौरव करण्यात आला. यावेळी संचालक जितेंद्र रावळ, विजय सुरी, राजेश अभाणी, भास्कर लांडगे, दिनेश गुरव, कय्युम पाटील, संदीप ओव्हाळ, तसेच आशरीन शेख यांचे आई-वडील, नातेवाईक आणि संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. शेख यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण जनता विद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर बी. एल. पाटील तंत्रनिकेतनमधून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेची पदविका पूर्ण करून पुणे येथून बी. टेक. पदवी संपादन केली. त्यानंतर बिहार लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवत सहाय्यक आयुक्त (राज्य विक्रीकर) पदावर त्यांची निवड झाली.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. मकरंद वझल, प्रशांत माने, कानिफनाथ गोरे, राजेंद्र म्हात्रे, सुनीता चव्हाण, तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भाऊसाहेब नन्नवरे यांनी केले.

## वीर जवान फाऊंडेशनतर्फे वीरांगनांचा गौरव

**| नवी मुंबई| प्रतिनिधी |**

वीर जवान फाऊंडेशनच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात रविवारी (दि.२६) जुलै रोजी कारगिल विजय दिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला शौर्य, सन्मान आणि राष्ट्रभक्तीचा भव्य सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला.





या कार्यक्रमाला पार्श्वगायक शंकर महादेवन, अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे, कर्नल अभिषेक कुमार, मेजर इंद्रजीत सिंह, कर्नल राउडे, विजय नाहटा, केतन कराडे, शौर्यचक्र विजेते मधुसूदन सुर्वे, वीर जवान फाऊंडेशनचे अध्यक्ष सुरेश काकडे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, वीरांगना, वीरमाता, एनसीसी कॅडेट्स, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

